रीइनव्हेंटिंग इंडिया पी आय सी पॉलिसी पेपर #१९

पुणे इंटरनॅशनल सेंटर

# कोविड-१९ नंतर महाराष्ट्रातील सावरणाऱ्या आर्थिक स्थितीला पुनर्चालना देण्यासाठी सुधारित धोरण

फेब्रुवारी २०२१

पुणे इंटरनॅशनल सेंटर

# कोविड-१९ नंतर महाराष्ट्रातील सावरणाऱ्या आर्थिक स्थितीला पुनर्चालना देण्यासाठी सुधारित धोरण

*फेब्रुवारी* २०२१

# अनुक्रमणिका

विभाग १

**प्रास्ताविक आणि योगदानकर्त्यांची यादी**

अ : योगदानकर्त्यांची यादी ०० 

ब :  प्रास्ताविक ०१

विभाग २

**गृहनिर्माण क्षेत्र** ०४

विभाग ३

**व्यवसाय करण्यातील सुलभतेसाठी सूचना** ०७

विभाग ४

**अधिक मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणुकीसाठी योजना: परदेशी कंपन्यांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यासाठी सहाय्य आणि व सुकरीकरण सेवा (शेर्पा मॉडेल)** ०९

विभाग ५

**'ठराविक मुदतीचा रोजगार' धोरणाची अंमलबजावणी** १४

विभाग ६

**शेती क्षेत्रातील सुधारणा** १५

विभाग ७

**शासनाशी संबंधित सुधारणा** १८

विभाग ८

**राज्य पातळीवर न्यायिक सुधारणा** २३

विभाग ९

**राज्य विद्यापीठ शिक्षणात सुधारणा** ३०

## अ: योगदानकर्त्यांची यादी

१. अभय पेठे
२. अजित रानडे
३. अमिताव मल्लिक
४. दीपक पारेख
५. देवदत्त मोडक
६. गौतम बांबावले
७. प्रदीप आपटे
८. प्रदीप भार्गव
९. प्रकाश आपटे
१०. प्रशांत गिरबने
११.रघुनाथ माशेलकर
१३.राजस परचुरे
१४. रवी पंडित
१५. शमशेरसिंग मेहता
१६. उमेशचंद्र सारंगी
१७. विजय गोखले
१८. विजय केळकर
१९. विशाल गायकवाड

पुणे इंटरनॅशनल सेंटर ज्यांनी या अहवालात महत्वपूर्ण योगदान दिले आहे अशा सर्वांचे आभार मानू इच्छिते

# ब: प्रास्ताविक

सध्याच्या काळात जगासमोर उभ्या ठाकलेल्या सर्वात मोठ्या आह्वानांपैकी एक म्हणजे कोविड-१९ ची महामारी. यातील जीवितहानीची संख्या अजून स्पष्ट व्हायची आहे. जगाने जीवितहानी आणि मोठे आरोग्यसंकट यांच्या बरोबरीने अर्थव्यवस्थाही कोसळताना पहिली. येत्या काही वर्षांत लोकसंख्येपैकी मोठ्या हिश्शाच्या कल्याणावर या आर्थिक संकटाचा परिणाम होणार आहे. महाराष्ट्राच्या विशेष संदर्भातच बोलायचे झाले तर महाराष्ट्रात १६,०१,३६५ लोकांना कोविडची लागण झाली आणि ४५,७२३ मृत्यू नोंदवले गेले आणि अजूनही या संख्येत वाढ होतेच आहे. आजवरच्या आर्थिक संकटांच्या इतिहासात, या महामारीमुळे आर्थिक दुष्परिणाम सर्वात तीव्र आहे.

राज्य सरकारच्या अगदी अलीकडील आर्थिक अंदाजानुसार मार्च २०२१ ला संपणाऱ्या वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेत स्थूल मूल्यवृद्धीत १६.४ टक्के संकोच होण्याची शक्यता आहे. राज्याच्या स्थूल मूल्यवृद्धीच्या (जीएसव्हीए ) अनुसार गतवर्षाच्या ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीमध्ये अर्थव्यवस्थेत ७.४ टक्के घसरण होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारच्या अहवालात प्रक्षेपित अंदाजानुसार , २०२१- २०२१ या वर्षात, शेतीव्यतिरिक्त इतर बांधकाम, स्थावर संपदा, खाणकाम व सेवा अशा सर्व क्षेत्रांत (स्थूल मूल्यवृद्धीच्या संदर्भात) गतवर्षीच्या तुलनेत नाममात्र वाढ होताना दिसेल. गतवर्षीच्या तुलनेत राज्याचे वस्तू व सेवा कराचे (जीएसटी) ऑगस्ट महिन्याचे संकलन तब्बल ९९८.८७ कोटी रुपयांनी उतरले आहे. गेल्या वर्षी ४६७४.८१ कोटी रुपये जी एस टी जमा झाला होता. तर या वर्षीचे संकलन ३६७५.९४ कोटी रुपयांच्या आसपास आहे.

**टेबल १. महाराष्ट्राचे वस्तू व सेवा कराचे (जी एस टी) मासिक संकलन (कोटी रुपये)**

| वर्ष महिने | २०१८-१९ | १०१९-२० | २०२०-२१ | % बदल |
|---|---|---|---|---|
| एप्रिल | ५३४८.७ | ५८०२.९७ | १०८०.५९ | १८.६२ |
| मे | ४५३८.२ | ४५३८.२ | २५५१.२२ | ५६.२२ |
| जून | ४८०४.८६ | ५२०२.०८ | ४८४९.६४ | ९३.२३ |
| जुलै | ४५१३.१८ | ४८०१.१९ | ३९२०.४५ | ८१.६६ |
| ऑगस्ट | ४३५५.४७ | ४६७४.८४ | ३६७५.९४ | ७८.६३ |
| सप्टेंबर | ४२६२.७९ | ४४११.४८ | ४३७९.८२ | ९९.२८ |

**टेबल २: महाराष्ट्रात जाहीर झालेली वस्तू व सेवा कराची (जी एस टी) भरपाई (२०१७-२०१८ ते २०२०-२०२१)**

| | | | | (कोटी रुपये) |
|---|---|---|---|---|
| राज्य | **२०१७-२०१८** | **२०१८-२०१९** | **२०१९-२०२०** | **२०२०-२०२१ (ऑगस्ट २०२० पर्यन्त)** |
| महाराष्ट्र | १४८८.०० | ८३३०.०० | १५०१८.१३ | **६८३७.००** |
| भारत | **४११४६.००** | **६९२७५** | **१२०४९८.२९** | **६५५४६.२०** |

स्रोत : https://gras.mahakosh.gov.in/

स्रोत : लोकसभा अतारांकित प्रश्न क्र.२१२, १४.०९.२०२०

महाराष्ट्र राज्याला, २०२०-२१ या पूर्ण वर्षासाठी केंद्र सरकारकडून मिळणे बाकी असलेली जीएसटी भरपाई २२,४३५ कोटी रुपये इतकी होती. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत, जीएसटी भरपाईपोटी ४८२०.०५ कोटी रुपये महाराष्ट्र राज्याकडे हस्तांतरित करण्यात आले होते. केंद्रसरकारने विशेष कर्ज योजनेतून कर्ज घेऊन ४८२०.०५ कोटी रुपये महाराष्ट्र राज्याकडे हस्तांतरित केले. याखेरीज राज्याच्या संपूर्ण कर्जमर्यादेपेक्षा १५० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त कर्ज घेण्याची राज्याला मुभा देण्यात आली होती .ग्राहकांकडून कमी मागणी दर्शवणारा आणखी एक आर्थिक निदर्शक म्हणजे शुल्क,आकार आणि दंड या स्वरूपात आकारल्या जाणाऱ्या सर्व विभागांच्या करेतर महसुलात झालेली तीव्र घट. मागच्या वर्षाच्या (एप्रिल-सप्टेंबर २०२९) तुलनेत या वर्षी (एप्रिल-सप्टेंबर २०२०) करेतर महसुलाच्या वसुलीत जवळपास ७३टक्के (६,३२८१ कोटी रुपयांवरून १,७३३ कोटी रुपये)घसरण झाली आहे. उत्पन्नात तीव्र घट होत असतानाच नियमित महसूल खर्चामुळे राज्याच्या तिजोरीवर बोजा पडत आहे. यामुळे राज्याला विकासकामांवरचा खर्च थांबवणे आणि पगार चुकवण्यासाठी ५२,०००कोटी रुपयांचे कर्ज घेणे भाग पडले आहे. आधीच यावर्षी आत्तापर्यन्त घेतलेले कर्ज गतवर्षीच्या तुलनेत २५९ टक्के जास्त आहे. त्यात राज्यातील बेरोजगारीच्या दरात ऑगस्टमध्ये २.३ टक्के वाढ झाली. जुलै महिन्यात बेरोजगारीचा दर ३.९ होता तो ऑगस्टमध्ये ६.२ झाला आहे. त्याच वेळी संपूर्ण राज्यभरात विषाणू संक्रमणाची दुसरी लाट नोंदवण्यात आली आहे.

या अरिष्टासंदर्भात महाराष्ट्राच्या आर्थिक वाढीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी जरूर त्या धोरणांची शिफारस करण्यासाठी प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. विजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञांचा एक गट तयार करण्यात आला. या (पी आय सी) तज्ज्ञगटात अभय पेठे, अजित रानडे, अमिताव मल्लिक, दीपक पारेख, देवदत्त मोडक, गौतम बंबवाले, निरंजन राजाध्यक्ष, प्रदीप आपटे, प्रदीप भार्गव, प्रकाश आपटे, प्रशांत गिरबाणे , राजस परचुरे, रवी पंडित, समशेर मेहता, सुमिता काळे, उमेशचंद्र सारंगी, विजय गोखले आणि विशाल गायकवाड यांचा समावेश होता. या गटाने क्षेत्रानुसार धोरणांविषयी शिफारशी केल्या/सल्ला दिला या गटाने, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (एमएसएमई), उद्योग क्षेत्र, गृहनिर्माण क्षेत्र, शेतीक्षेत्र, शहरी सुधारणा, उच्च शिक्षण, राज्याच्या न्यायव्यवस्थेतील सुधारणा, राज्याच्या

शासनव्यवस्थेतील सुधारणा,  कामगार सुधारणा, परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याबाबत सूचना या विषयांवरचे धोरणात्मक मसुदे प्रस्तावित केले.

या शोधनिबंधात आम्ही महाराष्ट्र शासनाला सादर केलेल्या या अनेक विषयांवरील क्षेत्रनिहाय शिफारशींचा सारांश मांडत आहोत.

# गृहनिर्माण क्षेत्र

**गृहनिर्माण क्षेत्रासाठीच्या सूचना टाईमलाईन आणि प्रसधान्यक्रमासह दोन भागात विभागल्या आहेत: अल्प मुदतीच्या सूचना आणि मध्यम मुदतीच्या सूचना**

**अल्प मुदतीच्या सूचना :**

**<u>१. स्थलांतरित कामगारांना पुन्हा कामावर रुजू होण्यासाठी मदत:</u>** मानवतावादी दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने स्थलांतरित कामगारांसाठी प्रवास व विम्याच्या वाढीव खर्चाची जबाबदारी घेण्याबाबत/भत्त्याची तात्पुरती योजना जाहीर करण्यात पुढाकार घ्यावा. उदाहरणादाखल,लॉकडाऊन उठवल्यानंतर अशी ४५ दिवसांसाठी सर्व राज्यभर अशी योजना लागू करता येईल. यासाठी विकसकांचा मध्यस्थ म्हणून उपयोग करून नंतर या खर्चाची भरपाई राज्य शासन करेल.

**<u>२. राज्य शासकीय संस्थांकडून भूखंड विक्रीसाठी विलंबित प्रदानाची योजना:</u>** सध्याच्या परिस्थितीत वित्तप्रवाहाबाबत काळजी घेणे गरजेचे आहे.अशावेळी शासकीय संस्थांकडून भूखंड विकत घेण्याला प्रोत्साहन देण्यासाठी एकदम सर्व किंमत चुकती करण्याचा आग्रह न धरता ग्राहकाला हप्त्याहप्त्याने/सावकाश दीर्घ मुदतीत पैसे देण्याची मुभा द्यावी. कारण आत्ताच्या वातावरणात आगाऊ किंमत वसुली व्यवहार्य नाही. याखेरीज रियल इस्टेट क्षेत्राला पुन्हा चालना देण्यासाठी एमएमआरडीए, सिडको आणि एमआयडीसी यांनी भूखंडांच्या किमती रास्त ठेवायला हव्या.

**<u>३. काही निश्चित काळासाठी मुद्रांक शुल्कात व नोंदणी शुल्कात सवलत किंवा माफी देणे:</u>** यासाठी दोन पर्याय सुचवले आहेत:

**i. पर्याय १:**

- विक्री, खरेदी, संमती व परवानगी (लीव्ह अँड लायसन्स) , अभिहस्तांतरण किंवा भाडेपट्टालेख यासारख्या जमिनीशी /स्थावर मालमत्तेशी संबंधित व्यवहारांसाठी काही निश्चित काळासाठी उदाहरणार्थ, ६ ते १२ महिने मुद्रांक शुल्क कमी करून केवळ १% इतके आकारावे.
- नोंदणी शुल्काला संपूर्ण माफी द्यावी.

**ii. पर्याय २:**

- वर उद्धृत पर्याय १ साठी विकल्प: फक्त तीन महिन्यांसाठी (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०) मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्कास संपूर्ण माफी द्यावी.
- संपूर्ण शुल्कमाफी कधी जाहीर करायची त्याची वेळ महत्त्वाची आहे. ही माफी लवकर दिली तर त्या काळात पावसाळा असेल. तसेच पितृपक्ष (श्राद्ध) सप्टेंबर १७, २०२० ला संपण्याचा अंदाज आहे.
- सणासुदीची सुरुवात व संपूर्ण शुल्कमाफीचा अल्पकाळ सर्व एकावेळी येत असल्याने अधिक ग्राहकांना गृहखरेदीसाठी प्रोत्साहन मिळेल.

**मुद्रांक शुल्क कमी करण्याचे इतर मुद्दे :** संयुक्त विकसन करार, संयुक्त उपक्रम विकसन आणि पुनर्विकसन प्रकल्पांसाठी मुद्रांक शुल्कात सवलत द्यावी. कंपन्यांचे एकत्रीकरण, विलीनीकरण, विघटन किंवा पुनर्रचना; एनसीएलटीचे निर्णय किंवा न्यायालयाच्या संमती शर्ती यांच्या बाबतीत कमाल देय मुद्रांक शुल्क १० लाख रुपयांपर्यंत असावे. यामुळे एकत्रीकरण व प्रकल्प पूर्ण करणे शक्य होईल.

**४. आकार आणि शुल्क यांच्यात कपात:** मुंबईत गोळा केले जाणारे अधिमूल्य (प्रीमियम) व शुल्क मुंबईसारख्याच इतर शहरांपेक्षा पुष्कळच जास्त आहेत. त्यामुळे मुंबईतील व्यवसाय करण्याचा अतिरिक्त खर्च कमी करण्याची तीव्र गरज आहे. शुल्क आकारणीत कपात व सुसूत्रता आणणे: नगरपालिका किंवा राज्य सरकार यांच्याकडे भरण्यात येत असलेली सर्व अधिमूल्ये/आकार/पट्ट्या/सेस/जिने, लिफ्ट-वेल(लिफ्ट वर किंवा खाली जाण्यासाठी लागणारी मोकळी जागा), लॉबी यांच्यासाठीचे अधिमूल्य आणि इतर अनेक देये यांच्यात विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (डीसीपीआर) अंतर्गत ५०% कपात करण्यात यावी. बांधकाम चालू असलेल्या जमिनीवरच्या (एलयूसी) आकारात तात्पुरती सवलत देण्यात यावी आणि एलयूसी मोजणी व गणनेच्या पद्धतीत सुधारणा/बदल करणे जरुरीचे आहे .

**विकसकांवरचा बोजा सुसह्य करण्यासाठी सुचवलेले इतर बदल:**

- नागरी जमीन कमालमर्यादेचे अधिमूल्य कमी करावे.
- किरकोळ विक्रेते, मॉल आणि हॉटेल्स यांच्यासाठी सवलती: या व्यावसायिक उपक्रमांसाठी असे सुचवण्यात आले आहे की, त्यांना वीज व पाणी देयके औद्योगिक दराने आकारण्यात यावीत.
- सहा महिन्यांसाठी मिळकत कर आकारू नये.

**५. महारेरा – प्रकल्प पूर्ण करण्याच्या कालावधीत वाढ करावी/ तारीख पुढे ढकलावी :** असे सुचवण्यात आले आहे की, प्रकल्प पूर्ण करण्याची मुदत किमान ६ महिन्यांनी वाढवून द्यावी.

**६. रूपांतराच्या नियमांत सुधारणा व कमी शुल्क आकारणे :** महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग २ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतरीत करणेसंबंधी नियम ), २०१९ - " रूपांतर नियमावलीचे" पुनरावलोकन करणे गरजेचे आहे. (वर्ग २ जमिनी या सहज रूपांतरित केल्या जाऊ न शकणाऱ्या जमिनी आहेत आणि असे रूपांतर करण्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक आहे)

**७. रेडी रेकनरचे दर वारंवार कमी केले पाहिजेत:** सदानिकांचे रेडी रेकनर दर किमान २५-३०% कमी करावेत असे सुचवण्यात आले आहे.

## मध्यम मुदतीच्या सूचना:

व्यवसाय करण्याचा खर्च कमी करावा, कार्यदक्षता आणि सुशासन असावे.
मान्यता प्रक्रिया सुरळित करणे: विशेषतः मुंबई महानगरीय विभागातले (एमएमआर) अडकलेले प्रकल्प, जलदगतीने मार्गी लावण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती आवश्यक आहे. तसेच पर्यावरणीय मंजुरीसाठी एक स्वतंत्र समितीही आवश्यक आहे.

**१. केंद्र आणि राज्य सरकरांमध्ये समन्वय असण्याची गरज असलेल्या उपाययोजना:**

- तारणांची ऑनलाईन अंमलबजावणी सुलभ करणे.
- मुद्रांक शुल्क, नोंदणी आणि इतर शुल्क वस्तू व सेवा कर (जीएसटी) मध्ये समाविष्ट करणे .

# व्यवसाय करण्यातील सुलभतेसाठी सूचना

देशाच्या आर्थिक वाढीमध्ये व्यवसाय करण्यातील सुलभतेची निर्णायक भूमिका असते. व्यवसाय करण्यातील सुलभतेमुळे थेट विदेशी गुंतवणूक होत असली तरी ही सुलभता/व्यवसायाभिमुखत वातावरण निर्माण करण्यासाठी शासनाने राबवलेल्या प्रक्रिया, नियम व नियंत्रणे यांचा परिणाम स्थानिक व्यवसायांवरही होतो. किंवा स्थानिक व्यवसायांच्या उद्योजकतेच्या महत्त्वाकांक्षा मर्यादित होऊन खुरटू शकतात.

जरी महाराष्ट्र राज्य विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आघाडीवर असले तरी शासनाने फक्त मोठ्या उद्योगांसाठीच नव्हे तर भांडवल आणि संसाधने कमी असलेल्या लहान कंपन्यांसाठीही सुलभ आर्थिक वातावरण निर्माण केले पाहिजे. मुक्त आणि रास्त आर्थिक वातावरण निर्माण करण्यासाठी व्यवसाय करण्यातील सुलभतेशी निगडित कायद्यांमद्धे पुढील बदल सुचवण्यात आले आहेत.

| | |
|---|---|
| महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७ | कामाच्या वेळा: कामाच्या वेळेशी संबंधित तरतुदी १ वर्षापुरत्या स्थगित ठेवाव्या; तथापि कोणाही कर्मचाऱ्याला १२ तासांपेक्षा जास्त काम करावे लागू नये किंवा करण्यास परवानगी नसावी. दैनंदिन कामकाजात ५ तासांपेक्षा अधिक सलग काम करावे लागू नये यासाठी २ विश्रांतीच्या सुट्ट्या असाव्यात. तसेच कोणाही कर्मचाऱ्याला सलग सात दिवस काम करण्यास परवानगी नसावी. |
| | ओवरटाइम: ओवर टाइमचा आहे तोच दर ठेवावा. |
| | अतिरिक्त दुकाने व व्यावसायिक आस्थापने सकाळी ६ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत उघडी ठेवण्यास परवानगी असावी. |
| कारखाना अधिनियम, १९४८ | प्रत्येक वर्षी ३१ जानेवारीपूर्वी जे कारखाने, कारखाना अधिनियम, १९४८ (क्र. ६३, १९४८) या कायद्याच्या पालनाविषयी तटस्थ पक्षाने तयार केलेला प्रमाणपत्र अहवाल अधिकारक्षेत्र असलेल्या पर्यवेक्षकाला सादर करतात; अशांना नियमित तपासणी प्रक्रियेतून सूट द्यावी. धोकादायक कामांना सूट देऊ नये. तसेच गंभीर अथवा प्राणघातक अपघात झाल्यास किंवा त्याबद्दल माहिती किंवा तक्रार मिळाल्यास, अशा कारखान्यांची तपासणी ही कामगार आयुक्तांच्या पूर्वपरवानगीनेच व्हावी.जे कारखाने प्रत्येक वर्षी ३१ जानेवारीपूर्वी प्रमाणपत्र अहवाल सादर करण्याची मुदत पाळत नाहीत ते अशी सवलत मिळण्यास पात्र नाहीत. |
| | कामाच्या वेळा: कलम ५१, ५२,५३, ५४, ५६ यांतून सूट मिळावी तसेच जर वहिवाटदाराने आरोग्य सुविधा व सुरक्षिततेची हमी दिली तर कलम ५९ व ६१ च्या तरतुदी पुढील १२ महिन्यांसाठी तहकूब ठेवाव्यात.<br>पुढील १२ महिन्यांसाठी : सर्व कारखान्यातील कामगारांना (धोकादायक कामे करणारांव्यतिरिक्त) प्रतिदिन २ सुट्ट्यांसह १२ तास काम करण्याची परवानगी असावी. |

| | |
|---|---|
| | यात ओवरटाइम धरून दर तिमाहीमध्ये कामाचा कमाल वेळ २५० तासांपेक्षा अधिक असू नये असे सुचवण्यात यावे. तसेच कोणाही कर्मचाऱ्याला सलग सात दिवस काम करण्यास परवानगी नसावी. |
| | नवीन कारखान्यासाठीच परवाना/अनुज्ञप्ती आणि नूतनीकरण केलेला परवाना ऑन लाइन प्रक्रियेने ३ कामकाजी दिवसांत मंजूर झाला पाहिजे आणि कामाच्या तीन दिवसांत प्रतिसाद न मिळाल्यास तो मंजूर झाला असे मानले जावे.<br>विवरणे: सर्व दुकाने व कारखान्यांनी वेगवेगळ्या कामगार कायद्यांखाली अनेक विवरणे भरण्याऐवजी एकत्रित वार्षिक विवरण भरावे. |
| औद्योगिक विवाद अधिनियम आणि दुकाने व आस्थापना अधिनियम | कामगाराची व्याख्या: "कामाच्या स्वरूपाच्या" पलीकडे जाऊन ज्या व्यक्तीचा मासिक पगार ५०,०००/- रुपयांपेक्षा जास्त असेल त्या व्यक्तीस कामगार मानले जाऊ नये अशी भर सध्याच्या व्याख्येत घालावी.<br>विवरणे: सर्व दुकाने व कारखान्यांनीवेगवेगळ्या कामगार कायद्यांखाली अनेक विवरणे भरण्याऐवजी एकत्रित वार्षिक विवरण भरावे. |
| माथाडी अधिनियम | फक्त महाराष्ट्रातच लागू असलेला माथाडी अधिनियम रद्द करण्याची शिफारस करण्यात येते. इतर राज्यांप्रमाणे त्या कामगारवर्गाचा समावेश कंत्राटी कामागारांत करावा. |
| व्यवसाय सुलभता | कारखान्याची व्याख्या - २० कामगारांऐवजी ५० कामगार अशी सुधारणा करावी. यामुळे सूक्ष्म लघु मध्यम उद्योगांना नोंदणी व कायदे यांच्या गुंतागुंतीत न पडता सहजी लहान युनिट्स उभारता येतील. तथापि, कामगारांना सुरक्षितपणे काम करता येण्याजोगी परिस्थिती आणि मूलभूत सुविधा कामाच्या ठिकाणी मिळाव्यात यासाठी त्यांच्या सुरक्षितता व कल्याणाविषयी कोणतीही सवलत देऊ नये. |
| लोकसेवा हक्क अधिनियम | सरकारी विभागांकडून लोकांना पारदर्शक आणि मुदतशीर सेवा मिळतील अशी खातरजमा करणारा लोकसेवा हक्क अधिनियम मोलाचा आहे असे आम्ही समजतो. आम्ही असे सुचवतो की, सरकारी विभागांना अर्ज मिळाल्यानंतर त्यांच्याकडून ७२ तासांत प्रतिसाद दिला जावा. |

# अधिक मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणुकीसाठी योजना : परदेशी कंपन्यांना महाराष्ट्राकडे आकर्षित करण्यासाठी सहाय्य आणि व सुकरीकरण सेवा (शेर्पा मॉडेल)

**या पेपरमध्ये पुढील योजनेची रूपरेखा मांडली आहे. यातील कृतीबिंदू पुढीलप्रमाणे:**

१. पुढील सल्लागार समितीची नेमणूक :

श्री. दीपक पारेख (अध्यक्ष) खालील सदस्यांसह :
प्रतिनिधी: विजय गोखले
प्रतिनिधी: गौतम बंबवाले

मुख्य सचिव (उद्योग) महाराष्ट्र शासन, ( पदसिद्ध )
श्री. आदिल झैनुलभाई
डॉ. अजित रानडे
श्री. इशात हुसैन
श्री. के. व्ही. कामत
श्री. मेहेर पदमजी
डॉ. नौशाद फोर्बस
श्री. प्रकाश आपटे
श्री. रवी पंडित
अध्यक्ष, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज असोसिएशन (पदसिद्ध)
अध्यक्ष, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन (पदसिद्ध)
अध्यक्ष, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (पदसिद्ध)
श्री. प्रशांत गिरबाणे, पुणे इंटरनॅशनल सेंटर

**२. थेट विदेशी गुंतवणुकीसाठी (एफडीआय) उमेदवार कंपन्यांची निवड करताना महाराष्ट्र शासनाने तीन विभागांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे :**

- मोठ्या जागतिक कंपन्या, ज्या स्वतःसोबत सहायक / पुरवठा साखळी घेऊन येतील.
- मध्यम आकाराच्या “छुपे रूस्तुम” कंपन्या (हिडन चॅम्पियन्स), ज्या त्यांच्या उत्पादन-तंत्रज्ञानात जागतिक स्तरावर अग्रभागी असतात, बहुतेक वेळा कौटुंबिक मालकीच्या आणि निर्यातीसाठी उत्सुक असतात.
- उदयोन्मुख उद्योग: विजेवर चालणारी वाहने, बॅटरी स्टोरेज, रोबोटिक्स, ॲडव्हान्स्ड मटेरियल्स

**३. महाराष्ट्र शासनाने लक्ष्य कंपन्या निश्चित करून प्रत्येक कंपनीसाठी शेर्पा (मदतनीस) तसेच चमू नेमल्यानंतर या कंपन्यांना भारतात पुढील सेट अपची/ मांडणीची गरज पडेल:**

(अ) सुकरीकरण (फॅसिलिटेशन) भागीदार
(ब) ज्ञान भागीदार
(क) कर आणि कायदेविषयक भागीदार
(ड) बँकिंग भागीदार
(ई) चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री

यापैकी (अ) म्हणजे एमआयडीसी किंवा इतर राज्यशासन-संचालित फॅसिलिटेटर असू शकतो तर (ई) एक राज्यस्तरीय चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री असू शकते. परंतु (ब),(क),(ड) यांचा शोध घेऊन, योग्य त्या नावांची यादी करून, ती संभाव्य गुंतवणूकदारांना माहिती करून द्यावी लागेल. संभाव्य गुंतवणूकदारांना भारताबद्दल फारशी माहिती नसताना, त्यांनीच गुंतवणूक करण्यापूर्वी अशा महत्त्वाच्या सेवांसाठी बाजारपेठ धुंडाळावी अशी अपेक्षा केल्यास प्राथमिक टप्प्यातच गुंतवणूकदारांचा उत्साह मावळेल.

**४. महाराष्ट्र शासनाने खालील सुविधा पुरवाव्या**

अ) प्रत्येक कंपनीसाठी स्वतंत्र खास हॉटलाइन, फॅक्स आणि ईमेल पुरवली जावी. यांद्वारे त्या कंपनीच्या प्रश्नाला संबंधित तज्ज्ञांकडून उत्तर दिले जाईल. ही उत्तरे वास्तवावर आधारित असावीत, वेळ मारून नेण्यासाठी दिलेली नसावीत. तसेच ही उत्तरे संभाव्य गुंतवणूकदाराला केवळ एखाद्या वेबसाईटकडे किंवा इतर शासकीय विभागांकडे पाठवणारी नसावी

ब) लक्ष्य कंपनीने विनंती केलेल्या विषयांवर वेबिनार. बऱ्याच कंपन्या गुंतवणुकीचे निर्णय घेताना, त्यांच्याशी संवाद साधणाऱ्यांना पाहणे /ऐकण पसंत करतात. यासाठी वेबिनार हे चांगले साधन/माध्यम आहे.

क) अनुभवकथन आणि परस्पर-संवाद (नेटवर्किंग): लक्ष्य कंपन्यांना इतर गुंतवणूकदारांचे अनुभव ऐकणे जरुरीचे वाटू शकते. महाराष्ट्र शासनाने ज्यांचा अनुभव चांगला आहे अशा विदेशी कंपन्यांची संदर्भ देण्यासाठी यादी करणे उपयुक्त ठरेल. अशा प्रकारचे अनुभवकथन आणि परस्पर संवाद प्रत्यक्ष किंवा आभासी माध्यमातून घडवता येतील.

ड) गुंतवणूक धोरणांबद्दल अद्ययावत माहिती देणे: धोरणांमधील बदलांबाबत लक्ष्य कंपन्यांना माहिती देणे आणि जागरूक करणे जरुरीचे आहे.

**५. लक्ष्य कंपन्या शोध /त्यांची निवड कशी करावी याबद्दलचा दृष्टिकोन:**

अ) चेम्बर्स ऑफ कॉमर्स किंवा भारतातील विदेशी व्यवसाय संघटनांचा उपयोग करून घ्यावा.

ब) ज्या कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करण्यात रस दाखवला आहे अशा कंपन्यांबद्दल आपल्या दूतावासातून किंवा उच्च आयोगातून (हाय कमिशन) माहिती गोळा करणे.

क) महाराष्ट्रात भरलेल्या उद्योग मेळ्यांचे आणि प्रदर्शनांचे डेटाबेस वापरून बाजारपेठेत कशात रस आहे यावरून संभाव्य गुंतवणूकदारांची निवड करणे

ड) खासगी गुंतवणूक आणि सल्लागार संस्थांना कंपन्यांची नावे सुचवायला सांगावे

ई) निवडक मुख्य गुंतवणूकदार राष्ट्रांच्या महावाणिज्यदूतांना महाराष्ट्र शासन/मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी आमंत्रित करावे. [उद्देश: सर्व शक्य स्रोतांतून कंपनीसंबंधी तथ्य, माहिती गोळा करण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायाच्या प्रतिमानांवरून त्यांची सुयोग्यता निश्चित करणे, 'मेक इन महाराष्ट्र'शी त्यांची अनुरूपता किंवा ते सुसंबद्ध आहेत की नाही हे पडताळून पहाणे आणि त्यांच्या योजनांची माहिती घेणे (विशेषतः चीन सोडून भारतात येत असल्यास)]

**६. शेर्पा आणि चमूने त्यांच्या लक्ष्य कंपनीबाबत काय करावे?**

(अ) व्यवसायाचे वर्णन, गुंतवणुकीच्या योजना, बाजारपेठेची समज आणि अपेक्षा याबद्दल माहिती स्पष्ट करणारी प्रश्नावली तयार करून प्रत्येक उत्सुक लक्ष्य कंपनीसाठी पाठवावी.

(ब) कंपनीच्या योजना व आह्वाने समजून घेण्यासाठी त्यांच्या प्रतिनिधीबरोबर व्हिडिओ किंवा कॉन्फरन्स कॉलद्वारे प्रश्नावलीचा पाठपुरावा करून महाराष्ट्र शासन कशा प्रकारे मदत करू शकेल ही माहिती द्यावी.

(क) विश्वासार्हता निर्माण होण्यासाठी वेबिनार किंवा अनुभव कथनाचा इ-कार्यक्रम आयोजित करण्याची तयारी दाखवावी.

(ड) वेबिनारमध्ये विचारलेल्या प्रश्नांची लेखी उत्तरे द्यावीत. कंपनीच्या विशिष्ट अपेक्षांबद्दल माहिती देण्यासाठी दुसरा वेबिनार आयोजित करण्याविषयी सुचवावे. या वेबिनारच्या वेळी पुढील बाबींविषयी तज्ज्ञांचा सल्ला उपलब्ध करून देण्यात यावा: कर व कायदेविषयक बाबी, बिझनेस व नोकरीसाठी व्हिसा मिळण्याची प्रक्रिया, बाजार प्रवेश वित्त पुरवठ्याचे पर्याय, मानवी संसाधन शोधणे व नोकरभरती, जमीन वाटप , सरकारी अधिकाऱ्यांशी संपर्क (परवानग्या/मान्यता/कंपनी नोंदणी प्रक्रिया याबाबत), बाजारपेठेचे मूल्यांकन करण्यास मदत करतील असे सुचवण्यात आलेले भागीदार, तांत्रिक शक्यता आणि योजना तयार करणे.

(इ) मंजूरी, सुकरीकरण तसेच प्रोत्साहन तरतूद यांबाबत सरकारी सहाय्याचा अंतर्भाव असलेली बाजार-प्रवेशाची योजना आखून ती सादर करावी. या योजनेत सुविधा पुरवण्यासाठी आणि प्रक्रिया पूर्तीसाठी आवश्यक तो अवधी (टाइम स्केल) यासारखे विशिष्ट तपशील असावेत. (अशा तऱ्हेच्या सक्रिय सहभागाचा फायदेशीर परिणाम होतो))

(ई) शेर्पाने कंपनीच्या मुख्य कार्यालयाला भेट देणे किंवा कंपनीच्या व्यवस्थापनातील व्यक्तींना भारतभेटीसाठी आमंत्रण देणे .

(फ) कंपनी आणि शेर्पा यांच्यातील संपर्क त्याची/तिची दुसरीकडे बदली झाली तरी चालू रहावा कारण विश्वास निर्माण झाल्यावर गुंतवणूकदार सातत्याला महत्त्व देतात.

**आम्ही इथे अधोरेखित करू इच्छितो की, याबाबतीत पुढाकार घेऊन कृती करणे निकडीचे आहे. त्यामुळे पुढाकाराचा लाभ मिळतो. या सर्व कृती विनाविलंब करणे महत्त्वाचे आहे कारण महाराष्ट्र शासनाकडे वेळ कमी असणार आहे.

## ७. लक्ष्य कंपनीने प्राथमिक निर्णय घेतल्यानंतर शेर्पा किंवा महाराष्ट्र शासनाने पुढची कोणती पावले उचलवीत? /पुढे काय करावे?

(अ) कंपनीच्या कार्यविशिष्ट प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी खास त्या कंपनीसाठी वेबिनार किंवा सादरीकरणे तयार करावीत (उत्तरे मोघम नसावीत). ही प्रश्नोत्तरे सहसा पुढील गोष्टींसंदर्भात असतात: जीएसटी , हस्तांतरण किंमत निर्धारण (ट्रान्सफर प्राइसिंग), वापरात असल्यास इतर कर-आकारणी, कामगार कायदे, कंपनी निगमन व नोंदणी, जमिनीसंबंधी परवानग्या (योग्य जागा शोधणे) व आवश्यक सेवा, महाराष्ट्र शासनाने देऊ केलेली उत्तेजनपर अनुदाने, पुरवठा साखळीतील अडचणी, वित्तउपलब्धीचे पर्याय इत्यादि (ही यादी परिपूर्ण नाही). [लक्ष्य कंपनीकडून वेबिनारच्या आधीच प्रश्न मागवणे सोयीचे जाते. यामुळे शेर्पा उत्तरे तयार ठेवू शकतात किंवा योग्य त्या तज्ज्ञांना आमंत्रित करू शकतात.]

(ब) शेर्पांचा कल प्रश्न सोडवण्याकडे असावा. त्यांनी वैयक्तिक पातळीवर सातत्याने लक्ष्य कंपनीच्या संपर्कात राहावे. दोन-तीन दिवसांत किमान एकदा संपर्क साधावा आणि सर्व प्रश्नांना तत्परतेने व अचूक उत्तरे द्यावीत. [यासाठी सद्यस्थिती दर्शक तक्ता (क्वेरी स्टेटस् लॉग चार्ट) उपयुक्त ठरतो. या तक्त्यात विचारलेल्या प्रश्नांची संख्या, ते तज्ज्ञांकडे पाठवले किंवा नाही, उत्तर दिले, अजून उत्तर तयार नाही इत्यादी माहिती असावी.
<u>सूचना:</u> यामुळे कामात पारदर्शकता येते व विश्वासार्हता वाढते.]

(क) विदेशी गुन्तवणूकदाराचे व्हिसासंबंधी प्रश्न सोडवण्यासाठी व व्हिसा मिळण्याची प्रक्रिया सुरळीत पार पडावी त्यांना सहाय्य करावे. यासाठी त्या देशातील भारतीय दूतावास किंवा दूतावास किंवा उच्चायुक्तालयाशी निकट संपर्कात राहावे. दूतावास किंवा उच्चायुक्तालय लक्ष्य कंपनीशी संवाद साधून महाराष्ट्र शासनाचा स्थानिक प्रतिनिधी या नात्याने कार्यवाही करत असल्याची खातरजमा करावी. [<u>सूचना:</u> हे काम आपल्या दूतावासांकडून नियमितपणे केले जाते.]

(ड) कामे व त्यांच्यासाठी निर्धारित वेळ यांची उद्दिष्टे लक्ष्य कंपनीच्या सल्ल्याने ठरवावीत व त्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. [सूचना: हा मुद्दा विश्वासार्हतेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.]

(इ) ऑन-लाइन फीड बॅक अर्जांद्वारे सहाय्य व सेवांच्या सुकरपणाची परिणामकारकता जोखणारी यंत्रणा असणे उपयुक्त आहे. [सूचना: हे काम शेर्पांव्यतिरिक्त इतर व्यक्तींनी करावे.] फीडबॅकनुसार शेर्पांनी कामात सुधारणा कराव्यात.

## ८. लक्ष्य कंपनीने गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतल्यानंतर शेर्पांनी काय करावे?

(अ) जागेचे परीक्षण तसेच भूखंड निश्चितीविषयी मदत करणे.

(ब) लक्ष्य कंपनीला बाजारपेठेविषयी माहितीचा गोषवारा /बाजारपेठेचे परीक्षण मिळण्यासाठी मदत करणे. (हे काम खाजगी क्षेत्रातील संस्था करतील पण महाराष्ट्र शासन जरूरीनुसार मदत करू शकेल.)

(क) कंपनीला गुंतवणुकीसंदर्भात मदत हवी असल्यास शेर्पा वित्तासहाय्याच्या कार्यपद्धती आणि स्रोत सुचवू शकेल.

(ड) करपद्धती आणि कायदेशीर मुद्दे ही महत्त्वाचे भाग आहेत. परदेशात बहुशः अशी धारणा आहे की भारतीय करपद्धती तसेच कायद्याची प्रणाली किचकट व गुंतागुंतीची आहे. महाराष्ट्र शासनाला या बाबतीत लक्ष घालावे लागेल.

(इ) विशेषतः उदयोन्मुख उद्योगांसाठी, तंत्रज्ञान आणि बौद्धिक संपदा हक्क हेही कळीचे मुद्दे आहेत. शेर्पा व महाराष्ट्र शासनाला भारतातील क्षेत्रविशिष्ट नियमांबदल मार्गदर्शन करावे लागेल.

**९. शेर्पाचा चमू**

(अ) शेर्पाची किमान अर्हता सचिव, महाराष्ट्र शासन, किंवा मुख्यमंत्री कार्यालय / उद्योग विभागातील नोडल अधिकाऱ्यांनी मान्य केलेली इतर अर्हता असली पाहिजे. प्रत्येक शेर्पाने दिशानिदेशन सत्र तसेच कालांतराने होणारी उजळणी सत्रे यांत सहभागी झाले पाहिजे. बहुतेक वेळा ही सत्रे ऑनलाइन स्वरूपाची असतील.

(ब) फ्रंट एंड व बॅक एंड उपक्रमांसाठी एक समिती नेमावी. यातील सदस्यांकडे कर व कायदेविषयक नैपुण्य असले पाहिजे.

(क) दर आठवड्यात केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्याची पद्धत रूढ केली पाहिजे.

(ड) लक्ष्य कंपनीचा बाजारपेठेत प्रवेश निश्चित करण्यासाठी टाइम लाइन ठरवणे जरुरीचे आहे

(इ) प्रगतीवर लक्ष ठेवून गरज पडेल तेव्हा सुधारणा करत राहणे .

(फ) प्रत्येक प्रश्नाला विचारलेल्या दिवशीच उत्तर देणे व सतत संपर्कात राहणे. हे शक्य नसल्यास नेमके उत्तर देण्यास किती वेळ लागेल हे कळवणे.

(ग) कंपनीचे प्रतिनिधी राज्यात येतील तेव्हा कंपनीसाठी नियोजित केलेल्या जागेला भेट (साईट-विजिट) देणे तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी गाठी भेटी आयोजित करण्यात मदत करणे .

(ह) संपूर्ण प्रत्यक्ष प्रक्रियेत कंपनीला सहाय्य व मार्गदर्शन करणे .

**१०. संस्थात्मक रचना:**

(अ) महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागातील व मुख्यमंत्री कार्यालयातील नोडल अधिकारी: (सचिव/ मुख्य सचिव/ अतिरिक्त मुख्य सचिव)

(ब) अडथळे जलद दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनातील सचिवांची समिती.

(क) शेर्पांचा चमू.

(ड) एमसीसीआयए (महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर) कडून बॅक एंड सहाय्य.

(इ) संभाव्य संधी सुविहित निवडण्यासाठी सल्लागार व बँकर्सची नेमणूक.

(फ) सल्लागार गट (वरील सर्व समित्यांचा भाग)

**११. तत्काळ कारवाईः** सल्लागार गटाने २० संभाव्य संधी असलेल्या (प्रॉस्पेक्ट) कंपन्यांची एक शॉर्टलिस्ट तयार करून मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठवावी. त्यानंतर नोडल ऑफिसर ताबडतोब सूचीबद्ध कंपन्यांच्या एमडी/ अध्यक्षांना आमंत्रणाचे ईमेल पाठवू शकतील. तसेच प्रथम पत्रव्यवहाराला मिळणाऱ्या प्रत्येक कमी अधिक सकारात्मक प्रतिसादासाठी शेर्पा नियुक्त करू शकतील.

# 'ठरावकि मुदतीचा रोजगार' धोरणाची अंमलबजावणी

विद्यमान कर्मचारीवर्गापैकी काहीजणांमध्ये धोरणांचे/ आदेशांचे पालन न करणे, अकार्यक्षमता, गैरवर्तन आणि शोषण करण्याची चुकीची पद्धत रूढ आहे. या चुकीच्या पद्धती नाहीशा करण्याच्या यंत्रणेची सुरुवात करण्यासाठी पुढील शिफारसी देण्यात येत आहेत. यामुळे सहभागी घटक म्हणजे मालक, कर्मचारी आणि सरकार या सर्वांचेच हित साधले जाईल. इथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, मजुरांच्या स्थलांतरामुळे सध्या निर्माण झालेल्या आपल्या राज्यातील संकटात अशा चुकीच्या पद्धतींचाही वाटा आहे.

**<u>१. कंत्राटी कामगार – ठराविक मुदतीचा रोजगार, संदर्भ आणि सक्ती:</u>**

मालक/ नियोक्ता आणि कामगार संघटना यांनी संयुक्तपणे कंत्राटी कामगारवर्गाच्या गरजा पूर्ण करण्यासाठीचा व्यावहारिक/ कायदेशीर/ न्याय्य पर्याय म्हणून ठराविक मुदतीचा रोजगार ही संकल्पना मांडली. या व्यवस्थेत, नियोक्ता कामगाराची त्याच्या पगारपत्रकावर (यात रास्त मोबदला व सामाजिक सुरक्षिततेची हमी दिलेली असते) थेट नेमणूक करतो, कामगाराच्या कामावर थेट देखरेख व नियंत्रण ठेवतो, परंतु ठरलेल्या मुदतीपलीकडे रोजगार चालू राहण्याचे बंधन नसते. कामावरून काढल्याबद्दलचे फायदे/ ऐच्छिक सेवानिवृत्ती आणि मध्यस्थही नसतात. सर्व राज्यातील उद्योजकांना या यंत्रणेचा फायदा व्हावा म्हणून, एक पाऊल पुढे जाऊन केंद्रीय कामगार मंत्रालयाने, राज्य सरकारांना याविषयी सूचना जारी करण्याचा सल्ला दिला. केंद्रीय कामगार सचिवांच्या ८ ऑक्टोबर २०१८ तारखेच्या पत्राची प्रत इथे जोडली आहे. आम्ही अनेकदा महाराष्ट्र शासनाजवळ या बाबतीत् पाठपुरावा केला आहे.

**<u>२. सध्याच्या काळाशी सुसंगतता आणि महाराष्ट्र शासनाकडून आमची मागणी:</u>**

ठराविक मुदतीचा 'रोजगार' ही राज्यात वैध पध्दत समजली जाण्यासाठी सुधारित अधिसूचना जारी करावी असा प्रस्ताव सरकारसमोर मांडण्यात येत आहे. अशी अधिसूचना यापूर्वी केंद्र सरकारच्या (आणि दोन राज्य सरकारांच्या) दीर्घकाळ विचाराधीन होती. हे कार्यकारिणीच्या अधिकारात आहे आणि मंजुरीसाठी विधानसभेत जाण्याची गरज नाही. कोविडच्या संकटाच्या नंतर अर्थव्यवस्था आणि उद्योग स्वतःला पुनर्चालना देत आहेत. आशा वेळी ही उपाययोजना लागू करणे समयोचित ठरेल. यामुळे सर्व कर्मचाऱ्यांसाठी समानता, लवचिकता आणि निष्पक्षपात खात्रीने निर्माण करता येईल तसेच कर्मचारीवर्गाचा मोठा भाग औपचारिक कार्यपद्धतीचा स्वीकार करेल.

# शेती क्षेत्रातील सुधारणा

कोविडच्या संकटाच्या काळात, अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांपैकी फक्त शेती या एकाच क्षेत्रात उत्कर्ष/ सकारात्मक वाढ नोंदवली गेली. हे खरे असले तरी महाराष्ट्रातील शेती म्हणजे ही यश व अपयशाचे गुंतागुंतीचे मिश्रण आहे. समृद्ध शेतीचे नवे मार्ग विकसित करण्यासाठी, सकारात्मक बदलांचा वेग वाढवण्यासाठी आणि शेतीची परिस्थिती सधारण्यासाठी आम्ही काही महत्त्वपूर्ण धोरणात्मक उपक्रम प्रस्ताकरत आहोत:

**<u>१. जमीनधारणा कायद्यांत सुधारणा :</u>**

(अ)कुळवहिवाट कायदे बदलणे आवश्यक आहे. अस्तित्त्वात असलेल्या मालकाला हक्क गमावल्याखेरीज जमीन भाडेपट्टीवर देणे आणि घेणे शक्य व्हावे. तसेच सध्याच्या कायदेशीर तरतुदींनुसार ठराविक काळयासाठी, खंड न पडता, सातत्याने जमीन भाडेपट्ट्यावर घेतल्यास पट्टीदार हा कायम भाडेकरू होतो आणि त्याला काढता येत नाही असा. या तरतुदी रद्द करणेही आवश्यक आहे. शहरी जमिनी व घरांसाठी अशा तऱ्हेच्या सुधारणा यशस्वी रीतीने करण्यात आल्या आहेत.

(ब) याचप्रमाणे ज्यांच्या मालकीची शेतजमीन नाही अशा व्यक्ती किंवा कायदेशीर अस्तित्व (कंपनी, संस्था इत्यादी) यांना शेतजमीन विकत घेण्यास मनाई आहे. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून मर्यादित काळासाठी परवानगी मिळवण्याचा मार्ग चोखाळला जातो. शेतीत व्हर्टिकल लिंकेज असलेल्या गुंतवणुकींसाठी ही तरतूदही रद्द करणे जरुरीचे आहे.

(क)शेतजमिनीवरील कमाल मर्यादेचा पुनर्विचार आवश्यक आहे आणि कॉर्पोरेट संस्थांना शेतजमीन विकत घेणे, भाडेपट्ट्याने घेणे/ शेतजमिनीचा गुंतवणूक प्रकल्पासाठी सोयीस्कर असा वापर करणे यांची परवानगी असावी.

(ड) शेतीसाठी अयोग्य जमिनीचा सौर शेतीच्या निर्मितीसाठी विचार केला जावा.

(इ) वनीकरणासाठी उद्योजकांना योग्य ती कार्बन क्रेडिटस् उपलब्ध करून देण्यात यावीत.

**<u>२. बियाणे:</u>** शासनाने जनुकीय बदल केलेल्या बीजांच्या (किंवा लागवडीसाठी वापरल्या जाणाऱ्या झाडाच्या इतर भागांच्या) शेत-चाचण्यांना उत्तेजन दिले पाहिजे. सॅनिटरी व फायटोसॅनिटरी चाचण्या झाल्यानंतर वेळ न दवडता ते वाण (व्हरायटी) विक्रीसाठी बाजारात आणले पाहिजे.

**<u>३. व्यापार धोरणे:</u>** भारतात कृषी फ्यूचर्सची खरेदी-विक्री अत्यंत कमी आहे. चांगली किंमत निश्चित होण्यासाठी (प्राइस डिस्कव्हरी) व किमतीची जोखीम कमी करण्यासाठी कोणते पीक घ्यावे हा निर्णय मागील वर्षीच्या किमतीऐवजी भविष्यातील किमतीनुसार घेतला पाहिजे. त्याचबरोबर आपल्याला शेती उत्पादनांसाठी फ्यूचर्स बाजार विकसित करावा लागेल. भारतीय कृषी-फ्यूचर्स बाजार निर्माण करण्यासाठी शासनाने पुढील मुसदद्यांवर भर दिला पाहिजे: (१) संसाधन संस्थांसाठी प्रशिक्षण व क्षमता विकसन; (२) इतर प्रदेशांसाठी आदर्श प्रक्रिया म्हणून बिहार व राजस्थानमधे राबवलेल्या उपक्रमांचे अनुभव उपयोगात आणणे; (३) शासकीय मध्यस्थीचा प्रबळ

पाठिंबा नसलेल्या पिकांवर/शेतमालावर भर देऊन, काम करण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे; (४) अशा पिकांची उत्पादन केंद्रे निश्चित करून त्या केंद्रांभोवती वितरण केंद्रे उभारणे जेणेकरून या भागात फ्यूचर्सच्या खरेदी-विक्रीला प्रोत्साहन मिळेल;(५)कृषी फ्यूचर्सवर भर देणे, ठराविक पिकांना असणारे शासकीय संरक्षण कमी करणे, उत्पादनात गरजानुसार बदल करणे यासाठी नव्याने उदयाला येणाऱ्या आशियाई देशांच्या अनुभवांवरून बोध घेणे; (६) खरेदी- विक्री करणाऱ्या अभिकर्त्यांना (एजन्सीज) कृषी-फ्यूचर्स बाजारात सहभागासाठी प्रोतसाहन व प्रेरणा देणे; आणि (७) फॉरवर्डस आणि ऑप्शन्स साधनांना उत्तेजन देणे.

**<u>४.शेती डेटा आणि संबंधित मुद्दे:</u>** आंतरविभागीय माहितीची देवाणघेवाण: उदाहरणार्थ, एमएसएएमबी/ एपीएमसीने घरोघर भाजीपाल्याचा पुरवठा करण्यासाठी पुण्यातील गृहरचना संस्थांविषयीचा डेटा वापरला. आगामी कृषीजनगणनेत प्रतिपादित जमीन हक्क आणि जीपीएस स्थानांकनासहित वैयक्तिक ओळखपत्र म्हणूनआधार कार्डाचा वापर करून सर्व शेतकऱ्यांची नोंदणी केली पाहिजे.

**<u>५.प्रादेशिक असमतोल:</u>** शेतीला बढावा व शेतमालाला बाजारभावातील चढ-उतरांपासून संरक्षण देण्यासाठी प्रदेशनिहाय शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योग/ पार्क्सच्या निर्मितीला प्रोत्साहन दिले पाहिजे. विदर्भ व मराठवाड्यात सोयाबीन अन्न प्रक्रिया तसेच कपाशी, फळे व भाजीपाला आणि यांच्यावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगांना चांगले भवितव्य आहे. विदर्भ व मराठवाड्यासारख्या मागास भागात बागायती शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी 'हॉर्टिकल्चर मिशन' कार्यान्वित केले पाहिजे.

**<u>६.कोरडवाहू शेती:</u>** आपण कोरडवाहू शेतीला भांडवल-प्रधान बनवू शकत नाही. उत्पन्न फारसे कमी न करता लागवडीची किंमत खाली आणणे गरजेचे आहे. जमिनीचा कस टिकवून (उत्पन्नाची) गरज पूर्ण करण्यासाठी मिश्र पिके किवा पीक आवर्तन या पद्धतींनी शेती करता येईल. सद्यस्थितीत शेतकऱ्याला बियाणे, खते, कीटकनाशके या सर्व वस्तू विकत घ्याव्या लागतात व ह्या वस्तूंचे उत्पादक असलेले उद्योजक त्यांच्या किमती ठरवतात. या सर्व वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत राहतात पण त्यांच्या बरोबरीने शेतीमालाची किंमत कधीच वाढत नाही. आपण उत्पन्नावर भर न देता प्रत्यक्ष पिकावर आणि पीक काढण्याच्या व विक्रीच्या किमतींतल्या फरकावर (मार्जिन) भर दिला पाहिजे. भरपूर उत्पन्न झाले तरी या किमतींतला फरक कमी असेल तर शेतकऱ्याला काहीच फायदा होणार नाही. तेव्हा आपला उद्देश उत्पादन-प्रक्रियेची किंमत कमी करणे असला पाहिजे. शेतकऱ्याला त्यांच्या खेड्यात हव्या त्या वाणाचे बीजोत्पादन करता व ते इतर लोकांमध्ये वाटता आले पाहिजे. यामुळे शेतकऱ्याला द्यावी लागणारी किम्मत ३० टक्क्यांनी कमी होईल. रासायनिक खतांची मात्रा कमी करून जैविक/हरित खतांचा, आवरण पिकांचा (कव्हर क्रॉप) पूरक वापर केल्यास पिकांच्या पोषणाची गरज पूर्ण होतेच शिवाय रासायनिक खतांवर होणार खर्च वाचून उत्पादन प्रक्रियेची किंमतही कमी करता येते. इतर सर्व पर्याय अयशस्वी झाले तरच अखेरचा उपाय म्हणून कीटकनाशके वापरावीत. आपल्याला हरितक्रांती तंत्रज्ञानाचे प्रारूप बदलून त्याऐवजी अल्प किमतीच्या आदानांवर आधारित तंत्रे वापरायला हवीत. त्यामुळे कर्जाची गरज आणि स्वतः केलेली गुंतवणूक दोन्ही कमी करता येतील. असे करता येणे शक्य आहे आणि ही माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचवणे जरुरीचे आहे. यापूर्वी कृषी विस्तार कर्मचाऱ्यांनी जशी हरितक्रांती तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचवली तशीच ही

माहितीही ते शेतकऱ्यांपर्यंत पोचवू शकतात.

**<u>७. इतर महत्त्वाच्या शिफारशी :</u>**

- शेतकऱ्यांसाठी विशेष कार्डची योजना सुरू करणे. या कार्डवर शेतकऱ्यांचे नाव, बँकेखाते/ कर्ज खाते /भू-मापन सर्वेक्षण क्रमांक ही माहिती असेल.
- शेतकऱ्यांकडून ॲग्रिॲपद्वारा पीकक्षेत्र अहवाल / हंगामासाठी नोंदणी सादर करणे
- २५०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यासाठी किमान एक सूक्ष्म हवामान केंद्र. (मायक्रो वेदर स्टेशन)
- शेतकऱ्यांना ठिबक सिंचन पद्धतीसाठी आवश्यक सामग्री पुरवणारांची यादी, सेवा व किमतीसह उपलब्ध करून देणे आणि अनुदान थेट जमा करणे.
- एका वर्षात फेज सेपरेशन पूर्ण करणे. फेज सेपरेशन पूर्ण झाले आहे तिथे वीजबिलातील अनुदानाची रक्कम खात्यात जमा करणे.
- कृषी विपणन प्रणालीची पुनर्रचना करण्यासाठी समिती नेमावी आणि कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आत्ताच्या प्लॅटफॉर्म्सचे रूपांतर इंटरनेटशी जोडलेल्या स्पर्धात्मक प्लॅटफॉर्म्समध्ये करावे. तसेच नियामक संरचनेचा त्याग करावा.

# शासनाशी संबंधित सुधारणा

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वेगाने बदलत आहे आणि येत्या काही वर्षांत या बदलअहं वेग अधिक वाढत राहील. बदलणार्या आर्थिक परिस्थितीच्या बरोबरीने प्रशासनाच्या कार्यपद्धतीत आणि धोरणात्मक प्रतिसादाच्या रचनेत बदल व विकास होणे आवश्यक आहे. बदलत्या संधी आणि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रशासकीय क्षमता अद्ययावत व सरस करण्यासाठी खालील उपाययोजना आम्ही सुचवत आहोत:

**<u>नागरी शासन :</u>**

स्थानिक पातळीवर सार्वजनिक वित्तव्यवस्थेचा आणि सुशासनाचा अभाव आहे. धोरण संरचना (अर्थशास्त्रीय तत्त्वांवर आधारित), प्रक्रिया व कृतीनियम सोपे करणे (व्यवहार करण्यासाठीचे खर्च) आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक क्षमता तयार करणे/वाढवणे (ठरवलेले काम करून दाखवणे) यातून सुशासन निर्माण होताना दिसते. संसाधनांची समस्या आणि शहरी स्थानिक संस्थांचे सबलीकरण (महानगरपालिका. नगरपालिका नगर परिषदा इ.) ही मोठी आह्वाने आहेत सस्थानिक शासन संस्था दुर्बल आहेत आणि यात सुधारणा होणे गरजेचे आहे. जी एस टी नंतरच्या काळात उओलब्ध असलेले महसूल वसुलीचे मार्ग, कार्यक्षमतेने अंमलबजावणी केली तरी अपुरे आहेत. त्यामुळे संपत्ती आणि मूल्यनिर्मिती करत असूनही शहरे स्वयंपूर्ण नाहीत. यामागचे मूलभूत कारण म्हणजे आपल्या करव्यवस्थेच्या उभरणीची पद्धत. शासनाच्या उच्च स्तराकडून आर्थिक पुरवठा होणे गरजेचे आहे. या वित्तपुरवठ्याकडे मदत म्हणून न पाहता गुंतवणूक म्हणून पहिले गेले पाहिजे. यामुळे शहरांचे शासन सुरळीत होऊन करवसुलीत होणारी वाढ (आणि इतर अनेक बाबी) शासनाच्या वरच्या स्तरांना सातत्याने लाभदायक ठरतील.

राज्य शासनापासून स्थानिक शासनापर्यंत निधीचे हस्तांतरण घडवून आणण्यासाठीचे माध्यम म्हणून राज्य वित्त आयोग काम करतात. राज्य वित्त आयोगयांचा गांभिर्याने विचार व्हायला हवा. केंद्रात, केंद्रीय वित्त आयोगाचे जे स्थान आहे; तेच स्थान राज्यात राज्य वित्त आयोग व त्यांच्या शिफारशीं चे असायला हवे. तीन एफ च्या (फंड, फंक्शन, फंक्शनरीज् म्हणजेच वित्त, कार्य, व कर्मचारी) निगराणीसाठी या मूलभूत आवश्यक गोष्टी आहेत. याच संदर्भात, चांगल्या फलनिष्पत्तीसाठी चुकीची धोरणे सुधारणे आवश्यक आहे.

आपल्याला विकास आराखड्यांच्या (डीपी) संपूर्ण क्षेत्राचे पुनरावलोकन करण्याची गरज आहे. ते संबंधित अर्थसंकल्पाशी/बजेटशी निगडित असले पाहिजेत आणि त्यांच्यात प्रधान्यक्रम निश्चित केलेले असले पाहिजेत. ते अत्यंतिक तपशीलवार परंतु अवास्तव आणि म्हणून कार्यवाहीसा कठीण नसावेत. तर संक्षिप्त/ कमीत कमी तपशील असलेले आणि धोरणात्मक असावे. शहर व्यवस्थापन आणि सबलीकरणाच्या संदर्भात शरद काळे समितीच्या परिवर्तनात्मक आणि सर्वसमावेशक अहवालावर विचार करणे उपयुक्त ठरेल. हा अहवाल बऱ्याच महिन्यांपूर्वी महाराष्ट्र शासनाच्या शहर विकास मंत्रालायाकडे प्रस्तुत करण्यात आला आहे.

**<u>१. सुशासनासाठी माहिती व विदा प्रणाली:</u>** बहुतेक राज्य शासनांकडे अनेक क्षेत्रांत व बाजूंबाबत माहिती व विदा/ अकडेवारीची कमतरता असते. माहिती व विदा (डेटा) गोळा करण्याची प्रणाली अपुरी, संथ आणि जुनाट नियंत्रण नमुन्यांवर आधारलेली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने (डीईएस), स्वतःचे रूपांतर विशाल विदा-निर्माण संस्थेत करण्यासाठी दोन मार्ग चोखाळले पाहिजेत:

(अ)प्रत्येक विभागासाठी ग्राहक/ लाभार्थींची स्वतंत्र, ॲप-आधारित प्रणाली विकसित केली पाहिजे. सामान्यत: वेगवेगळ्या विभागांचा लोकसंख्येच्या विशिष्ट भागाशी थेट संपर्क असतो. आता लोकसंख्येपैकी बऱ्याच जणांकडे आधार/जनधन/निवडणूक मतदार ओळखपत्र/ रंगानुसार आर्थिक स्तराचे वर्गीकरण दर्शवणारे रेशन कार्ड असते. स्थानिक शासनाने या सर्व साधनांची माहिती गोळा करून, अद्ययावत करून स्वतःच्या कामासाठी त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे.

(ब) विविध विभागांच्या ग्राहकांच्या सेवेबाबत समाधानासह अनेकविध घटकांवर डेटा एकत्रित करण्यासाठी लहान प्रश्नावलीसारख्या स्वत: च्या वेगवान सर्वेक्षण पद्धती विकसित केल्या पाहिजेत. सध्याच्या सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालयाने (एमओएसपी) घालून दिलेल्या आराखड्याखेरीज महाराष्ट्र शासनाने अशा स्वतंत्र प्रणाली विकसित केल्या पाहिजेत.

(क)एलपीजी ग्राहक व त्यांचे अनुदान याबाबत सध्या कार्यरत असलेल्या प्रणालीप्रमाणे इतर अनेक योजनांच्या लाभार्थींसाठी सेवा वितरण मागरिखनाची प्रणाली (डिलिव्हरी ट्रॅकिंग सिस्टम) कार्यान्वित करण्यात यावी. उदाहरणार्थ कर्जमाफी, सूक्ष्म-सिंचनासाठी अनुदान, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे वेतन, खरेदीतील सहभाग किंवा प्रमाणपत्र यांची नोंदणी.

(ड)आंतर-विभागीय डेटा सामायिक करणे: उदाहरणार्थ पुण्यातील गृहरचना संस्थांबद्दलचा डेटा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ /कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी घरपोच भाजीपाला पुरवठयासाठी वापरला.

(इ) सेवा वितरण, देखरेख आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी, सर्व शहरी स्थानिक संस्थांकडे जीआयएस वर आधारित आरबीडीएम डेटा असला पाहिजे.

(फ)आगामी कृषीजनगणनेत प्रतिपादित जमीन हक्क आणि जीपीएस स्थानांकनासहित वैयक्तिक ओळखपत्र म्हणून आधार कार्डाचा वापर करून सर्व शेतकऱ्यांची नोंदणी केली पाहिजे.

(ग)आरोग्य विभागाने वेगवेगळ्या वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्या सर्व वैद्यकीय संस्था/ रुग्णालयांचा समावेश असलेली एक माहितीचा मागोवा घेणारी (इन्फॉर्मेशन ट्रॅकिंग) प्रणाली विकसित करावी. यातून रुग्णांसाठी आधार कार्डाशी जोडलेले आरोग्य कार्ड तयार करता येईल.

**<u>२. पाणी धोरण व शासन :</u>**

I) <u>उत्कृष्टता केंद्र:</u> महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमध्ये उत्कृष्टता केंद्राची स्थापना करण्यात मदत करणे किंवा किमान आधीच असलेले असे एखादे केंद्र शोधणे. स्वतंत्र किंवा एकत्रितपणे,पाण्याशी संबंधित सर्व बाबींचा/ समस्यांचा आणि अपूर्ण/अर्धवट राहिलेल्या कार्यांचा (नंबर क्रंचिंगसह) अभ्यास हा पहिला संशोधन प्रकल्प म्हणून हातात घेण्यास या केंद्राला सांगण्यात यावे. हे काम एखाद्या तज्ज्ञ व्यक्ती किंवा संस्थेला तात्पुरत्या परामर्शासाठी देणे शक्य आहे. तथापि आमच्या मते उत्कृष्टता केंद्र हा अधिक चांगला पर्याय आहे. कारण

पुराव्यावर आधारित सुधारणा करण्यासाठी/ करण्याच्या अधिकारासाठी सातत्याने कार्यरत असणे आवश्यक आहे. तसेच हे केंद्रामुळे नियंत्रण बोर्ड आणि वाल्मी (जल व भूमी व्यवस्थापन संस्था)/ सी ए डी ए /जलसंपदा विभाग इत्यादि इतर सरकारी संस्थांच्या कार्याधिकाऱ्यांना संवाद साधण्याची, प्रबोधनाची आणि संशोधनात सहभागी होण्याची संधी मिळेल.

ii) महसुलाची मूल्यांकन केलेली/ आकारलेली रक्कम आणि प्रत्यक्ष मिळालेली रक्कम यात कोणतीही विसंगती नसल्याची खातरजमा करण्यासाठी योग्य माहिती व देखरेख यंत्रणा उभी केली पाहिजे.

iii) देण्यात आलेल्या सूट/ सवलतींचा गांभीर्याने विचार करेल पाहिजे. ज्या उद्दिष्टांसाठी प्रथम सूट देण्यात आली होती ती अजूनही सुसंगत आहेत का याविषयी अभ्यास करणे/ चर्चा करणे फायदेशीर ठरेल. हीच गोष्ट प्रोत्साहन म्हणून (पाणी वापरदारांच्या संघटनांसाठी) दिलेल्या सवलतींनाही लागू होते. यातील बऱ्याचशा संघटना अस्तित्वात/ कार्यरत नाहीत. तसेच सवलत दिल्यानंतरचा दर इतका कमी आकारण्यात येतो की त्याचा काही उपयोग नसतो. अशा सवलती चालू ठेवणे अतार्किक असल्याने हा विवादास्पद मुद्दा आहे. तेव्हा त्या तर्कसंगत कराव्यात किंवा रद्द कराव्यात.

iv) सध्याच्या शुल्क निश्चितीनुसार होणाऱ्या वसुलीची स्थिती पाहता शुल्क वाढवणे शक्य आहे. यासाठी संचालन आणि व्यवस्थापनखर्चाचे व्यवस्थित संगणन करणे. (यात सर्व वस्तू / घटक, उर्जा आणि इतर खर्चांची योग्य ती विना- अनुदान किंमत, प्रत्येकासाठी सिंचन यंत्रणेच्या देखभालीसाठी योग्य खर्च, मालमत्तेचे घसारा यांचा समावेश करावा लागेल) अर्थात संगणन करताना चलनवाढीपासून संरक्षणाचा (इनफ्लेशनरी हेज) विचार करावा लागेल. शुल्क ठरवताना किमान संचालन आणि व्यवस्थापन खर्च अधिक सर्व भांडवली खर्चाच्या १ टक्का रक्कम इतके तरी आकारायला हवे. खरे पाहता, निदान ५ वर्षांच्या कालावधीत तरी ही वाढ एक टक्क्याऐवजी तीन टक्क्यांपर्यंत आकारायला हवी. अर्थात भांडवल खर्चाची गणना भांडवलाच्या नियमित पुनर्स्थापनाच्या किमती नुसार न करता; पूर्वीच्या किमतीवर आधारित केली तर अशी शुल्कवाढ देखील पुनर्स्थापनाची व त्यात अंतर्भूत कर्जाची किंमत वसूल करण्यास पुरेशी होणार नाही. विविध क्षेत्रांसाठी सध्या वापरात असलेला शुल्क निश्चितीच्या आराखडयांवरून नवीन शुल्कसंचाचे संगणन करता येईल. यांचा वापर क्रॉस सबसिडीज शक्य तितक्या कमी करण्याच्या शर्तीवर शुल्क आराखडयात योग्य ते बदल करण्यासाठी करता येईल.

v) क्रॉस सबसिडीज तर्कसंगत व कमी करणे: भारतातील शेतीविषयक स्थितीची गोंधळाची व अनिश्चित हाताळणी पाहता, 'क्रॉस सबसिडीज तर्कसंगत व कमी करा' हे बोलणे सोपे असले तरी करणे अवघड आहे. हे करण्यासाठी वर सुचवल्याप्रमाणे शुल्कवाढ व नंतर टप्प्याटप्प्याने केलेल्या खर्च किंवा उत्पादनमूल्याच्या प्रमाणात सिंचन/शेतीवरील शुल्कवाढ करणे जरुरीचे आहे. शहरी/औद्योगिक क्षेत्राच्या तुलनेत सिंचन/शेती क्षेत्रातील प्रचंड अंतर भरून काढणे आवश्यक आहे हे दाखवून देणे सोपे जाईल. या दृष्टीने काही प्रयत्न सुरूही झाले आहेत. जर हे प्रयत्न अंतिम उद्दिष्टाच्या दृष्टीने योग्य दिशेने सुरू झाले तर तेही प्रगतीचे पाऊल असेल. निश्चित कालावधीत क्रॉस सबसिडीज काही प्रमाणात एका दिशेने (मोनोटोनिकल) घटत जाणाऱ्या बेंचमार्कपर्यंत कमी करत जाण्याच्या योजनेला गती दिली पाहिजे. कोणत्याही स्थितीत क्रॉस सबसिडीजची अवस्था अधिक बिघडू न देणे आवश्यक आहे.

vi) वरील सिद्धांत लागू करण्याचा एक मार्ग म्हणजे पाण्याची एकूण उपलब्धता प्रत्येक क्षेत्रासाठी ठराविक प्रमाणात दोन भागांमध्ये विभाजित करणे (कदाचित औद्योगिक क्षेत्र विचारात न घेता लोकसंख्येच्या वापरासाठी फक्त

ग्रामीण-शहरी क्षेत्राचा विचार करावा) सर्वसामान्य प्रमाण दर डोई दर दिवशी १३५ लिटर ते ५० लिटर (एलपीसीडी) इतके कमी असू शकते. किमान गरजा भागवण्यासाठी पुरेसे असण्याच्या दृष्टीने (तळातल्या संस्थांनी वितरण करण्याची जबाबदारी घेतली असेल अशा शर्तीवर) हे प्रमाण निश्चित केले पाहिजे यामुळे ग्रामीण भागात पशुधन व काही प्रमाणात संरक्षणात्मक सिंचनाची गरज भागावली जाईल. तसेच शहरी व ग्रामीण भागात पाणी वापराच्या सर्वसामान्य प्रमाणात फरक राहणार नाही. अशा रीतीने किमान गरजा (सैद्धांतिकदृष्ट्या शून्य मूल्य असलेल्या) भागवल्यानंतर ब्लॉक मूल्यनिर्धारणाचे तत्त्व वापरून पहिल्या भागापेक्षा अधिक प्रमाणतील पाण्यासाठी बाजारभावासारखी किंमत आकारावी. किमान या भागासाठी तरी आपल्याला शुल्कात वाढ व क्रॉस सबसिडीजमध्ये घट हे तर्कसंगत तत्त्व लागू करू शकू.

vii) असे धोरण फलद्रूप होण्यासाठी लागणारा आर्थिक आधार सरकारी आदेशाने अनुदान स्वरूपात देण्यात यावा. त्यानंतर अशा रीतीने मिळालेला महसूल, संचालन व नियोजनासाठी तसेच शेवटच्या टप्प्यातल्या प्रकल्पांच्या पूर्तीसाठी आणि नळाने पाणी पुरवठा करण्याच्या योजनांसाठी पूर्वनियोजनाप्रमाणे ठराविक प्रमाणात वापरावा.

viii) सध्या अस्तित्वात असलेल्या पीक रचना व तंत्रज्ञानावर आधारित शुल्क निर्धारण करण्याऐवजी सरासरी पर्जन्यवृष्टी आणि विस्तृत ॲग्रो-क्लायमेट झोनिंगचा विचार करून त्या प्रदेशाची स्वाभाविक भूरचना/ भूगोल आणि भूरूपशास्त्र या अधिक वैज्ञानिक आधारावर करावे.आदर्श स्थितीची कल्पना केली तर, विभांतर्गत असणारे भेदाभेद भाव कमीत कमी ठेवून माहिती संग्रहित करावी आणि त्यानुसार व त्यासाठी उत्तेजन द्यावे. असे केल्याने शेतीचे (इतर घटकांवरचे)अवलंबित्व कमी होईल. त्याबरोबरच शेतीची वाटचाल सर्वात अनुकूल तंत्रज्ञानाच्या वापरातून इष्टतम पीक रचनेच्या अप्राप्य/अशक्य वाटणाऱ्या उद्दिष्टाकडे तसेच कमीत कमी ऊर्जा वापरातून जास्त उत्पादन मिळवण्याच्या डिमांड साइड मॅनेजमेंटकडे सुरू होईल आणि विविध प्रणाली डब्लूएमजीआरच्या मागण्यांशी/ अपेक्षांशी मिळत्याजुळत्या व बदलास अनुकूल असतील.

**४. जलसंपदा व्यवस्थापनाची देखभाल व संचालन:**

प्रत्येक शेतकऱ्याला पाणी पुरवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांची रचना फक्त प्रवाह सिंचन पद्धतीची आहे. त्यांच्या मूळ नियोजनात उपसा जलसिंचन, सिंचनरहित घरगुती व औद्योगिक पाणी पुरवठा आणि पाणी वापरदारांच्या संघटना यांचा विचार केला गेला नव्हता. परंतु आता त्यांच्याकडून विविध आणि काही वेळा एकमेकांच्या विपरीत/विरुद्ध असलेली उद्दिष्टे संधी करण्याची अपेक्षा केली जात आहे. या प्रकल्पांच्या रचनेतील एकूण प्रकल्प कार्यक्षमता (ओपीइ) केवळ ४१ ते ४८ टक्के आहे. यावरून हे सांगण्याची गरज नाही की नानाविध निर्बंधांमुळे प्रत्यक्ष ओपीइ जेमतेम २० ते २५ टक्के इतकीच आहे. मर्यादित लाभासाठी रचना केलेल्या या प्रणालीकडून अवाजवी अपेक्षा केल्या जात आहेत.

सिंचन व्यवस्था म्हणजे मुख्य कालवे आणि त्यांच्या उपकालव्यांच्या मुखापर्यंतच्या प्रवाहाची व्यवस्था (जर उपकालव्यासाठी पाणी वापरदारांची संघटना असेल तर). सध्याची प्रणाली ही प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने नियंत्रित केलेली, मानव-संचालित, बहुतेकवेळा उघड्या कालव्यांची प्रणाली असते. यात मुख्य जलविमोचक (एच आर) आणि मध्य/ काट (सी आर) नियामकांची प्रत्यक्ष डेटावर आधारित कोणतीही व्यवस्था नसते. मुख्य जलविमोचक (एच आर)आणि मध्य/ काट (सी आर) नियामकांचे कालव्यांमध्ये मोक्याच्या जागी असलेले दरवाजे आणि डिसनेट

(सिंचनव्यवस्थेची रचना, व्यवस्थापन,संचालन आणि देखभाल) यांचे पाणीपुरवठयाचे नियंत्रण करण्यामध्ये मोठे महत्त्व आहे. परंतु धरणाचे एच. आर. आणि सी. आर. दरवाजे वापरायला त्रासदायक व अवघड असतात. मानवी नियंत्रणामुळे कालव्याच्या कार्याची लवचिकता कमी होते. पाण्याची पातळी आणि विसर्ग याविषयी प्रत्यक्ष डेटा नसल्याने दरवाज्यांचे कार्य तात्कालिकच राहते. पाण्यावरचे अभियांत्रिकी नियंत्रण प्रत्यक्ष वापरात येत नाही. पाण्याचा प्रमाणानुसार (व्हॉल्यूमेट्रिक) पुरवठा अशक्य होतो. वेळेवर व अंदाजानुसार पाणीपुरवठा केवळ कागदावरच राहतो. अमर्याद विलंब आणि अत्यंत अपुरा पाणीपुरवठा अपरिहार्यपणे पाण्याच्या संघर्षास कारणीभूत ठरतो. मुख्य यंत्रणेचे आधुनिकीकरण झाल्याशिवाय जल व्यवस्थापन, शासन आणि नियंत्रणात कुठलीही लक्षणीय सुधारणा होणार नाही. मुख्य यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यासाठी पुढील गोष्टी कराव्या लागतील:

- स्वयंचलित एचआर आणि सीआर गेट/ दरवाजे देणे.
- खास गेटससाठी एम आणि आर मोबाइल युनिट तयार करणे.
- हळूहळू पारंपरिक एचआर गेट बदलून वितरक (डिस्ट्रिब्युटर) वापरणे आणि मुख्य कालव्यातील सीआर गेट बदलून स्वयंचलित गेट/ दरवाजे वापरणे. उप-कालव्यातील सीआर गेट बदलून डकबिल अथवा कर्णकर्मी बांधांचा वापर करणे.
- आरंभी प्रमुख प्रकल्पांच्या मुख्य कालव्यांवर पर्यवेक्षी नियंत्रण आणि डेटा अधिग्रहण (एससीएडीए) यांची सुरुवात करणे.
- पाण्याच्या अप्रत्यक्ष मोजमापाकडे वळणे . विद्यमान/ जुने प्रकल्प आणि चालू असलेल्या प्रकल्पांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करणे .
- सर्व भविष्यकालीन प्रकल्पांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य करणे.
- एच.आर. आणि सी.आर. गेटचे औद्योगिक उत्पादन, डकबिल विअर, मोजण्याची उपकरणे वॉटर मीटर्स ही सर्व उपलब्ध करून देणे, बसवणे, त्यांची देखभाल, दुरुस्ती, कॅलिब्रेशन, स्वयंचलित डेटा संकलन इत्यादी स्वरूपात मोठ्या प्रमाणात व्यवसाय संधी असू शकतात.

**<u>५. शासनाचे पुनरभियांत्रिकीकरण:</u>**

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत आहे. प्रशासनाच्या पद्धतींनाही योग्य प्रकारे अर्थव्यवस्थेच्या बरोबरीने विकसित केले पाहिजे आणि आत्ताच्या गतीशी जुळवून घेतले पाहिजे. विशेषतः,सहज रीतीने व्यवसाय करणे, कायदेशीर, नियामक आणि कर-संबंधी अनुपालन करणे सुलभ, पारदर्शक असले पाहिजे आणि प्रशासनाशी कमीतकमी संबंध आला पाहिजे. अशा सुधारणेसाठी आणि प्रशासकीय पद्धतींमध्ये फेरबदल करण्यासाठी माहिती आणि विचारपूर्वक योजनांची आवश्यकता आहे. आम्ही सुचवतो की 'शासनाचे पुनरभियांत्रिकीकरण/ पुनर्रचना' करण्याकरता विशिष्ट शिफारसी देण्यासाठी ज्येष्ठ अनुभवी मंत्री किंवा माजी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी.

त्याचप्रमाणे राज्याची आर्थिक स्थिती नाजूक अगदी अनिश्चित झालेली असल्याने, माजी मुख्य सचिव किंवा अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खर्च व्यवस्थापनावरील समिती नेमण्याबाबत सरकार विचार करू शकते. या दोन्ही समित्यांना प्रथम अहवाल पुढील तीन महिन्यांत देण्याचे काम सोपवले जाऊ शकते.

# राज्य पातळीवर न्यायिक सुधारणा

अनिर्णित वादांच्या (पेंडन्सीज) संचित तुंब्याच्या संदर्भात उत्तर प्रदेशानंतर महाराष्ट्र दुसर्या क्रमांकावर आहे. देशातील तुरुंगात असलेल्या कैद्यांपैकी ६७% कच्चे कैदी आहेत. आपली न्यायव्यवस्था आणि शासनयंत्रणेबद्दल यामुळे वाईट मत निर्माण होते. या यंत्रणेवर ज्यांची उपजीविका चालते त्या कायदे व्यावसायिकांव्यतिरिक्त अन्य लोकांचा या प्रणालीवरील विश्वास कमी झाला आहे.

व्यवसायिक खटल्यांमध्येही अशीच परिस्थिती आहे. न्यायालयांमार्फत कराराची अंमलबजावणी हा एक दीर्घकाळ चालणारा, जवळजवळ निरर्थक उद्योग आहे. जवळजवळ २१% अनिर्णित खटले पाच वर्षांपेक्षा जास्त जुनेआहेत. ही परिस्थिती सुधारण्यासाठी पुढाकार घेण्यातील अभाव न्यायालयीन आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दर्शवितो. कमीतकमी महाराष्ट्रात हे चित्र बदलण्यासाठी सरकारणे खूप कष्ट करणे जरुरीचे आहे. त्यामुळे दोन फायदे होतील – मतदारांचे समर्थं मिळेल आणि स्थानिक आणि जागतिक गुंतवणूकदारांमध्ये महाराष्ट्राला अधिक आकर्षक स्थान मिळेल.

राज्य सरकारांच्या अंमलातील शिक्षेत सूट-सवलत देण्याबाबत राज्य यादीच्या मर्यादेत आणि आमच्या चमूचा सामूहिक अनुभवाच्या आधारे आम्ही खटल्यांचे प्रमाण मोठे असणाऱ्या आणि पेंडेंसीज वाढणार्या भागांवर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहेः

i) भूमी अभिलेख आणि जमीन महसूल

ii) अन्न व नागरी पुरवठा

iii) धर्मादाय आयुक्त

iv) सहकारी संस्था

v) कामगार कायदे

**<u>शिफारसी:</u>**

**<u>१. राज्य कायद्यांचे पुनरावलोकन व सुधारणा:</u>**

निवडलेले नियम चालू ठेवणे किंवा रद्द करणे: सद्य परिस्थितीत कोणतीही सुसंगतता न राहिल्यामुळे किंवा नंतर केलेल्या कायद्यांमुळे अप्रचलित झालेले अधिनियम विशद करणारी एक यादी आम्ही केली आहे. आम्हाला वाटते की ती कायद्याच्या पुस्तकातून, शासन चालविण्याची कोणतीही क्षमता गमावल्याशिवाय काढून टाकता येऊ शकते.

<u>अनेक कायद्यांचे एका कायद्यात एकत्रिकरण आणि संहितीकरण</u>

श्री. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सर्व जमीन महसूल कायदे एमएलआरसीमध्ये एकत्रित करण्यासाठी सरकारने यापूर्वीच एक समिती स्थापन केली आहे. उच्च शिक्षण, कामगार कायदा, देवस्थानम इनाम, पोलिस संबंधित कायदे, बाजार व मेळा कायदा इ. क्षेत्रातही अशीच कारवाई करण्यात यावी.

पुढील चालू कायद्यांचा सध्याच्या संदर्भात अभ्यास व त्यांच्या तरतुदींमध्ये योग्य ते बदल करणे

जिल्हा परिषद व पंचायत अधिनियम, नगरपालिका अधिनियम, वक्फ कायदा, खंड आणि एकत्रीकरण कायदा, वृक्षतोड अधिनियम इ. पुनः एकदा सध्याच्या संदर्भात कायद्यातील प्रक्रिया व अर्ज पुढे चालू ठेवणे किंवा बदलणे. सध्या उपलब्ध असलेली माहिती तंत्रज्ञान व डिजिटल टेलिकम्युनिकेशन (डीटी) साधने वापरून माहिती तंत्रज्ञान कायद्यातील व्याख्यांच्या धर्तीवर सर्व कायद्यांमध्ये समन्सची सेवा व कालावधी, वकिलांची व अधिकाऱ्यांची अनुपस्थिती, इतर कार्यपद्धती व प्रक्रिया, इत्यादींबाबत परिणामकारकता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी मानके प्रस्थापित करणे.

<u>सर्व कायदे व नियम सोप्या भाषेत मांडणे</u>

यात राज्य भाषा मराठीत भाषांतर करणेही समाविष्ट आहे.

<u>विविध कायद्यांमधील सर्व दंड व शिक्षा अद्ययावत करणे</u>

कंपनीअधिनियम, २०१३ आणि त्यातील दुरुस्त्यांमध्ये सूचीबद्ध कंपन्यांचे नियामकअसलेल्या सेबीने जारी केलेल्या आवश्यकतांचा समावेश करून एक उत्तम उदाहरण समोर ठेवण्यात आले आहे.

कायद्यांमध्ये ठराविक काळानंतर ते रद्द करण्याची तरतूद करणारे 'सूर्यास्त कलम किंवा सनसेट क्लॉझेस' आणि सूचीबद्ध केलेल्या उपशामक परिस्थिती वगळता पूर्वलक्षी खटले दाखल करण्यासाठी कालावधी/ तारखा सीमित करणे.

<u>निवडक नियम दरवर्षी अद्ययावतत करण्यासाठी,राज्य नियमांचे वार्षिक पुनरावलोकन करणाऱ्या विधान पुनरावलोकन समिती (एसआरसी) ची स्थापना करणे</u>

प्रत्येक वर्षी ही समिती विशिष्ट मंत्रालये/विभागांशी संबंधित अधिनियमांचे पुनरावलोकन करून मसुदा कायद्यासह अहवाल सादर करण्यासाठी ९ महिन्यांचा अवधी घेऊन सर्व काम ५ वर्षात पूर्ण करेल. दोन महिन्यांमध्ये हा अहवाल सार्वजनिक आणि प्रशासकीय अभिप्रायासाठी खुला केला जाईल. उरलेल्या एका महिन्यात ताज्या शिफारशींसह अंतिम अहवाल संबंधित मंत्रालयाकडे / विभागाकडे सादर करावा. मंत्रालय समिती आणि लोकांकरिता स्वीकार्य बदल करण्यासाठी वचनबद्धता प्रकट करेल. या प्रक्रियेतून सुटसुटीत आणि अधिक चांगली अंमलबजावणी करण्याजोगे कायद्याचे पुस्तक तयार होईल.

## <u>२. विवाद सोडवण्याच्या प्रक्रियेचे पुनरावलोकन आणि सुधारणा:</u>

कनिष्ठ न्यायव्यवस्थेमध्ये पेंडन्सी कमी करणे ही सर्वाधिक चिंतेची बाब आहे. सध्या प्रलंबित असलेल्या खटल्यांचे कारण/ कायदा/ विवादाची रक्कम / वय / प्रक्रिया इत्यादींवर आधारित वर्गीकरण केले जाऊ शकते. उदाहरणार्थ, 5 वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या खटल्यांसाठी प्रत्येक जिल्हा न्यायालयात किंवा तत्सम कोर्टात विशेष न्यायालयांची/बेंचेसची व्यवस्था करावी. हे खटले काढून घेऊन या विशेष न्यायासनांसामोर चालवावेत व 6 महिन्यांच्या आत त्यांचा निर्णय व्हावा. तसेच 50 लाख रुपयांहून कमी रकमेचे व्यावसायिक विवाद सोडवण्यासाठी जिल्हा स्तरावर विशेष न्यायालये निर्माण करावीत. यामुळे व्यावसायिक विवादांचे लवकर निराकरण होईल व उच्च न्यायालयावरील भार कमी होईल. इतर प्रकारचे खटलेही योग्य रीतीने एकत्रित करून याचप्रमाणे विशिष्ट कालावधीत निकाली काढले जाऊ शकतात.

<u>अर्धन्यायिक संस्थांमध्ये फॉर्म्स आणि प्रक्रिया अद्ययावत करणे</u>

वर उल्लेख केलेल्या 5 विभागांसाठी (भूमी अभिलेख आणि जमीन महसूल, अन्न व नागरी पुरवठा, धर्मादाय आयुक्त, सहकारी आणि कामगार कायदे) तसेच इतरही काहींसाठी फॉर्म्स आणि प्रक्रिया अद्ययावत करणे. सध्या उपलब्ध असलेली माहिती तंत्रज्ञान व डिजिटल टेलिकम्युनिकेशन (डीटी) साधने वापरून द्विरुक्ती कमी करण्यासाठी सुसूत्रीकरण आणि मानकीकरणासाठी केलेला अभ्यास आवश्यक आहे. एसआरसीबरोबर काम करण्यासाठी, माहिती तंत्रज्ञान व विधिज्ञांची एक फॉर्म आणि प्रक्रिया समिती (एफपीसी) स्थापन केली जावी. ही समिती एसआरसीच्याच कालावधीत जुनाट फॉर्म आणि प्रक्रियांमध्ये (निरनिराळ्या ठिकाणी तक्रार नोंदवण्यासाठीच्या न्यूनतम आणि उच्चतम मर्यादांचा अंतर्भाव करून) सुधारणा करेल. यामुळे वेळ, श्रम, कागद आणि इतर संसाधनांचा अपव्यय टळेल आणि भ्रष्टाचार व 'मध्यस्थी'/ हस्तक्षेपा च्या संधीही कमी होतील.

<u>अंतिम निवड्यापर्यंत पोचण्यासाठी लागणाऱ्या कृतीपायऱ्या/ टप्पे कमी करणे</u>

उदाहरणार्थ महसूलविषयक बाबींत केवळ दोनच वेळ अपील करण्याची तरतूद कायद्यात आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र 'सुधारणे'च्या नावाखाली अनेक स्तरांवर निर्णयप्रक्रिया होत राहते आणि खटला अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत नेला जाऊ शकतो. हे एक अपील आणि एक पुनरावलोकन अशा केवळ दोन स्तरांपर्यंत मर्यादित ठेवता येईल. एकूण प्रक्रियेसाठी लागणार कालावधी निश्चित करून त्याची अंमलबजावणी करता येईल.

याशिवाय, एफपीसी शिफारशींनुसार योग्य ते नियम लागू करून न्यायदाना संबंधित "स्थळ/ मंच खरेदी" वर बंदी आणल्यास अनेक मंचांवर एकच खटला चालवणे थांबेल. एफपीसी प्रमुख विभागांत म्हणजेच भूमी अभिलेख आणि जमीन महसूल, अन्न व नागरी पुरवठा, धर्मादाय आयुक्त, सहकारी आणि कामगार कायदे यामध्ये दावे कमी करण्यासाठी विभाग-विशिष्ट सूचना देऊ शकेल. राज्यशासनाकडून न्यायव्यवस्था आणि न्यायालयाचा वेळ यांचा वापर कमी करणे राज्यशासन व संबंधित संस्थांकडून दाखल होणारे दावे हा न्यायव्यवस्थेवरील सर्वात मोठा बोजा आहे.

<u>राष्ट्रीय अभियोग धोरणात हा बोजा कमी करण्यासाठी अनेक सूचना दिल्या आहेत. राज्याने याच धर्तीवर महाराष्ट्र अभियोग धोरण तयार केल्यास ते खूप उपयुक्त होईल</u>

या धोरणात लोकपाल/लोकायुक्तांची नियुक्ती लक्षात घेऊन खटले चालवणे/त्यांची समाप्ती तसेच खटले दाखल करण्याच्या/चालू ठेवण्याची मर्यादा निश्चित करणे यांचा समावेश असेल शासानांतर्गत विवाद एडीआर (पर्यायी विवाद निवारण) पद्धतीने सोडवता येतील. यामुळे न्यायव्यवस्थेवरील बोजा कमी होईल आणि मध्यस्थी करून विवाद सोडवण्याची कार्यकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढेल.

<u>जेव्हा दोन्ही दावे शासनानेच केले असतील किंवा जर एक पक्ष शासन असेल तर दुसऱ्या पक्षाच्या सहमतीने, मध्यस्थी करण्यासाठी लोकपाल किंवा लोकयुक्तांची नियुक्ती करणे</u>

जर राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने (जीएडी) लोकपालांच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षमता प्रदान करणारे हुकूम जारी केले तर ही प्रक्रिया परिणामकारक व कार्यक्षम होईल. तसेच खटले दाखल करणे /चालू ठेवणे किंवा ते कमी मुदतीचे करणे/ बंद करणे याच्या समर्थनासाठी खर्च व लाभ यांच्या मोजमाप निश्चित करणारी मार्गदर्शक तत्त्वे एफपीसी तयार करू शकेल. लोकपालांना वैधानिक सामर्थ्य नसते तसेच ते फक्त २० लाख रुपयांपर्यंतचे दावे चालवू शकतात. ही मर्यादा ५० लाख रुपयांपर्यंतवाढवायला हवी. तसेच, लोकपालांचे

उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी, त्यांनी दिलेला निकाल आणि शिफारसी / पुरस्कारांचा संक्षिप्त अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

## ३. विवाद सोडवण्याच्या पायाभूत सुविधांचे पुनरावलोकन आणि सुधारणा:

भौतिक पायाभूत सुविधा

बहुतेक न्यायाधिकरण आणि अर्धन्यायिक (क्यूजे) संस्था योग्य जागा, फर्निचर आणि इतर संबंधित पायाभूत सुविधांच्या अभावामुळे त्रस्त असतात. न्यायपालिका व कार्यकारिणीइतकेच या सुविधा दावेदारांच्या हितासाठी असल्याने सरकारने एफपीसीमार्फत दरवर्षी आवश्यक पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेचा आढावा घेण्याची व शिफारशींची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

लोक/मानवी पायाभूत सुविधा

नवीन प्रक्रियात्मक आवश्यकता आणि तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने कायदा अधिकारी, दंडाधिकारी, कोर्टाचे कर्मचारी इत्यादींच्या प्रशिक्षणाची गरज आहे. येथे पुन्हा, एफपीसीला शिफारसी देण्याचे काम दिले जाऊ शकते. या शिफारशी नंतर लागू केल्या जाऊ शकतात. उट्टण येथील महाराष्ट्र न्यायिक अकादमीकरवी राज्यभरातील न्यायालयीन अधिकाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी ऑन साइट आणि प्रवास असलेले असे दोन्ही कार्यक्रम राबवणे शक्य आहे.

## ४. आयटी आणि डीटी पायाभूत सुविधा

कायद्यानुसार आणि न्याय मंत्रालयाद्वारे चालविल्या जाणार्या राज्य कायदे आणि नियम व नियमांनुसार महानिती डेटा ग्रिड तयार करणे

विविध मंत्रालये त्यांच्या प्रशासनाकरता आवश्यक असलेल्या कायद्यांच्या संदर्भात माहिती अद्ययावत ठेवण्यास जबाबदार असतील. यामुळे खटले लांबण्यास कारणीभूत असणाऱ्या माहिती आणि वेळ यांच्या तफावतींमुळे उद्भवणारे लाभ घेण्याची संधी कमी होईल. आणि न्यायव्यवस्था तसेच दावेदार यांचे नुकसान वाचेल. महानिती, महान्याय आणि महामाहिती यांची निर्मिती करून ते पीपीपी (सार्वजनिक न्यास प्रकल्प) उपक्रम म्हणून चालवल्यास कमीतकमी सरकारी खर्च आणि त्वरित अंमलबजावणी साधता येईल. पीआयसी सदस्य यात आनंदाने सहभागी होतील.

महान्याय या भविष्यकालीन खटल्यात उपयुक्त ठरू शकणाऱ्या (प्रिसिडेंट वॅल्यू) न्यायालयीन निर्णयांच्या/ आदेशांच्या डेटाबेसची स्थापना करणे

यातील माहिती न्यायाधीश आणि दावेदार दोघांनाही सहज व कमी किमतीत उपलब्ध होईल. याबरोबरच नियमात बदल करून कोणताही खटला दाखल करण्यापूर्वी/ फाइलिंग स्वीकारण्यापूर्वी अशा डेटाबेसमधील माहितीचे संशोधन अनिवार्य करावे. त्यामुळे गांभिर्याचा अभाव असलेले व पुनरुक्ती करणारे खटले कोर्टापुढे येणार नाहीत आणि न्यायाधीश व दावेदार दोघांच्याही वेळाचा अपव्यय टळेल. याबद्दलचे तपशील परिशिष्ट ६ मध्ये दिलेल्या टिपेत आहेत. दावेदारांना संशोधन सहाय्य करणे आणि कायदेशीर सहाय्य देणे यामुळे फायलींग होईल आणि पर्यायाने विलंबही कमीत कमी होईल. पुढे, एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि एमएल (मशीन लर्निंग) मधील संशोधन न्यायपालिकेला लवकर निर्णय घेण्यास साहाय्यकारी ठरू शकले.

महामाहिती म्हणजेच लोकांना जिथे राज्य सरकारच्या सर्व योजनांची माहिती मिळेल अशा माहिती ग्रीडची आवश्यकता आहे

यातून नागरिकांना राज्य सरकार त्यांच्यासाठी काय देऊ शकते याची जाणीव होईल. उदाहरणार्थ थेट खात्यात पेमेन्टचे फायदे. अशी माहिती मिळाल्यामुळे बनावट माहितीचा प्रसार थांबेल, भ्रष्टाचार आणि सत्तास्थानाच्या जवळ वावरणाऱ्या मध्यस्थांमुळे होणारा विलंब कमी होईल. यामुळे विवादाची कारणे, पर्यायाने प्रलंबित खटले आणि न्यायदानातील विलंबही कमी होईल.

मंत्रालय / विभागनिहाय वेब उपस्थिती आणि वेब-आधारित कार्यप्रदर्शन अहवाल

नागरिकांशी संपर्क वाढून शासनाचे नागरिकांचे विवाद कमी करण्यासाठी, प्रत्येक मंत्रालये महामहितीचा भाग म्हणून वेबपोर्टल्स स्थापित करू शकतील. बरेच वेळा विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे (एफएक्यू) देऊ शकतात, नागरिकांच्या सूचना स्वीकारू शकतात आणि संबंधित मंत्रालय/ विभागाने मागील तिमाहीत/ वर्षात केलेल्या कामाबद्दल नागरिकांना अहवाल देऊ शकतात. नागरिक आणि सरकारमधील संपर्क/ समजून घेण्यामधले अंतर भरून काढून विवादाचे प्रमाण कमी करण्यात याचे मोठे योगदान असू शकते.

# राज्य विद्यापीठ शिक्षणात सुधारणा

शिक्षण आणि इतर मानवी विकास निर्देशकांमधील कामगिरीच्या दृष्टीने महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य मानले जाते. जरी राष्ट्रीय परिमाणांच्या तुलनेत आपण सामान्य मापदंडांवर चांगले कार्य करीत असल तरी आपल्याला आणखी चांगली कामगिरी करण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक आणि प्रौढ-शिक्षणाचबाबत विशेषत: विशिष्ट असुरक्षित गटांसाठी (जसे की मराठवाड्यातील महिला आणि आदिवासींसाठी) गुणवत्तेत सुधारणेची अपेक्षा करताना, आपल्याला नेहमीच्या मार्गापासून (बिझनेस अ‍ॅज यूज्वल) दूर जाण्याची आवश्यकता नाही. कोविड-१९ महामारीमुळे शिक्षणात मोठा अडथळा निर्माण झाला. सर्व शैक्षणिक तास तसेच सर्व स्तरांवरच्या परीक्षांतही मोठा व्यत्यय आला. परीक्षांची वेळापत्रके कोलमडली आणि याला कोणताही पर्याय उपलब्ध नाही. पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर, टाळेबंदी/ लॉकडाऊनमुळे उन्हाळ्याच्या सुट्टीतील इंटर्नशिप आणि जॉब ट्रेनिंगसाठी जाण्याची प्रक्रिया थांबली आहे. अनेक संस्थांमध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी कोणतीही नोकरी मिळण्याची/ प्लेसमेंट प्रक्रिया सुरू केली जाऊ शकली नाही. पुढील शैक्षणिक वर्ष नेहमीप्रमाणे जून महिन्यात सुरू होऊ शकत नाही. ते सुरू होण्यात किमान ४ महिन्यांचा विलंब अपेक्षित आहे. स्वभाविकतः अधिक असुरक्षित घटकांना याचा प्रमाणाबाहेर मोठा फटका बसला आहे आणि या नुकसानाचा काही भाग कायम राहील अशी भीती वाटते. हे तत्काल जाणवणारे प्रश्न आहेत आणि आणि **आयटीचा फायदा आणि इतर आणीबाणीच्या आणि नाविन्यपूर्ण पद्धती तसेच सर्व भागधारकांच्या त्वरित क्षमता वाढवण्यातून,आपल्याला कमी नुकसानीसह या परिस्थितीतून बाहेर पडावे लागेल. हे मुद्दे ज्ञानाशी संबंधित (एपिस्टेमिक) नाहीत; त्याऐवजी त्यांचा राजकीय इच्छाशक्ती आणि अंमलबजावणीचा संबंध आहे. आम्ही इथे उपयुक्त ठरेल अशा काही गोष्टी नमूद करतो :**

(अ) सॅम पित्रोदा यांनी विद्यापीठाच्या शिक्षणाच्या क्षेत्रात सुचविलेल्या 'गुणवत्ता' आणि नीड्स- ब्लाइंड अप्रोच (म्हणजेच विद्यार्थ्याला प्रवेश देताना तो फी भरू शकेल की नाही याचा विचार न करता त्याच्या क्षमतेनुसार प्रवेश देण्याचा दृष्टिकोन) या महत्त्वाच्या घटकांकडे महाराष्ट्रात दुर्लक्ष केले गेले आहे.

(ब) बहुसंख्य समित्यांच्या विद्यापीठांमध्ये अभ्यासात सर्व विषयांचा समावेश असण्याच्या शिफारसीकडे दुर्लक्ष केले गेले आहे आणि आम्ही एककेन्द्रित सिलो (वैद्यकीय / तांत्रिक विद्यापीठे इत्यादी) तयार करणे चालू ठेवले आहे.

(सी) राज्यातील विद्यापीठांमध्ये विद्यार्थी प्रचंड मोठ्या संख्येने शिकतात. पण आपण ऐतिहासिक, उच्चभ्रू संस्थांकडून समकालीन सामूहिक विद्यापीठांकडे संक्रमण करण्यात अपयशी ठरलो आहोत. संक्षिप्त स्पष्टीकरणात्मक टिपांसह विशिष्ट भागधारकांसाठी कृती बिंदू खाली दिले आहेत: आम्ही राज्य सरकारपासून सुरुवात करतो:

- विद्यापीठीय शिक्षणात आवश्यक पुनर्रचनेसाठी संसाधनांबरोबर शासनव्यवस्थेतील सुधारणांची गरज सर्वाधिक महत्त्वाची आहे. शासनात धोरण संरचना, प्रक्रिया व कृतीनियम आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक क्षमता तयार करणे/वाढवणे हे तीन घटक समाविष्ट असतात. त्यामुळे यातील सुधारणा या तीन घटकांमध्येच होणे आवश्यक आहे. राज्य विद्यापीठांसाठी ही एक महत्त्वाची बाब आहे कारण त्यांची सुरळीत शासन प्रक्रियेत

महत्त्वाची भूमिका असते. अन्यथा खासगी विद्यापीठे राज्य विद्यापीठांचे स्थान हिरावून घेतील आणि याचा मोठा फटका असुरक्षित आणि सामाजिक मागासांना बसेल.

• सरकारने विद्यापीठे अनेक संस्थांमध्ये विभाजित करण्याची प्रक्रिया त्वरित सुरू करावी. मोठ्या संबद्ध संरचना नियोजन करण्यास कठीण असल्याचे सिद्ध झाले आहे; शिवाय ते विविध ग्राहक आणि भौगोलिक वैशिष्ट्यांना न्याय देऊ शकत नाहीत. एकतर त्यांनी एककांच्या मार्गाने जावे किंवा आकार लहान (५०-१०० पेक्षा कमी महाविद्यालये) ठेवावा. समृद्ध वर्षाचा प्रश्न असेल तर पॅरिस विद्यापीठाचे अनुकरण करावे. तिथे त्यांनी मातृ-विद्यापीठातून निर्माण झालेल्या विविध छोट्या विद्यापीठांना पॅरिस विद्यापीठ १ , पॅरिस विद्यापीठ २ अशी नावे दिली आहेत. आजपर्यंत अशी १७ विद्यापीठे तेथे आहेत.

• सर्व रिक्त पदे भरून पुरेशी संसाधने द्यावीत. हे सरकारचे मूलभूत काम आहे. तेव्हा 'भरा,बंद करा, विसरून जा!' अशी भूमिकाअसावी. शासनाने विद्यापीठांकडून जबाबदार असण्याची अपेक्षा बाळगणे गैर नाही पण शिक्षणतज्ज्ञांच्या कामात हस्तक्षेप करू नये. तसेच स्वायत्ततेचा आदर करा (सर्वांनाच एकाच मापात मोजता येत नाही) म्हणून प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार वाढू द्या. प्रमाणीकरण आणि एकसारखेपणा निर्माण करण्याचा प्रयत्न करू नका. केवळ आंतर-विद्यापीठ बदल्यांसाठी समानता निर्माण करणे अद्याप शक्य आहे.

• इथे केलेल्या शिफारशींपैकी एक स्पष्ट शिफारस म्हणजे उच्चशिक्षणासाठी अर्थसंकल्पीय तरतुदी सध्या निराशाजनक पातळी वर असून त्या कमीतकमी दुप्पट करणे आवश्यक आहे. असे केले तरच वर दिलेली उद्दिष्टये साध्य करता येतील.

• राज्याने एक उच्च कार्यकारी राज्य परिषद (एससीएचई) स्थापन केली पाहिजे. रुसा निधीसाठी पात्र होण्यासाठी ही अट पूर्ण करणे जरुरीचे आहे. ही शासनापासून तटस्थ असलेली, नियोजन व नियंत्रण करणारी संस्था असेल. ती शासनाचा उच्च शिक्षणविषयक दृष्टिकोन निश्चित करेल तसेच ती केंद्र शासनाकडून अर्थसाहाय्य मिळवण्याचे मध्यम म्हणून काम करेल. ती विद्यापीठांच्या कारभारावर देखरेख करेल परंतु विद्यापीठांच्या कामकाजाच्या स्वायत्ततेचा आदर करेल आणि सरकारला लूपमध्ये (संपर्कात) ठेवेल. ही रचना विविध क्षेत्रांत देशात उदयास येणाऱ्या शासनाच्या संरचनेशी मिळतीजुळती आहे.

• कौशल्ये विकसित करण्याची शक्यता आणि रोजगाराची क्षमता वाढविण्यासाठी, विद्यापीठाच्या विभागांशी संबंधित सामुदायिक महाविद्यालये स्थापन करण्यास उत्तेजन दिले पाहिजे. या विभागांशी संबंधित असल्याने त्यांची सिलोसारखी अवस्था न होता, त्यांना प्रतिष्ठा मिळेल. आयटी मॉडेलच्या तुलनेत हे महत्त्वाचे असण्याची शक्यता आहे कारण चांगले विद्यार्थी सहजपणे मुख्य प्रवाहात जाऊ शकतील आणि सामाजिक मान्यता असलेल्या पदव्या प्राप्त करू शकतील.

• विद्यापीठांना 'ई' जगात स्थानांतरित करण्याकरता शासनाची मदत आवश्यक आहे. ही मदत केवळ हार्डवेअर

पुरती मर्यादित नाही (हार्डवेअर आधीच बहुतेक ठिकाणी प्रस्थापित केलेले आहे). तर स्थानिक (मराठी) भाषेत कंटेंट (अभ्यास-साहित्य) निर्माण करणे महत्त्वाचे आहे. लोकसंख्येतील असुरक्षित भाग तसेच ग्रामीण भागातील लोकांना अनेक संकटांचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. विशेष तरतूद करणे आवश्यकआहे जेणेकरुन असे सर्व विद्यार्थी इंटरनेट / वायफाय सहजपणे उपलब्ध असलेल्या कम्युनिटी सेंटरमध्ये जाऊ शकतील आणि त्यांचा अभ्यास चालू ठेवू शकतील.

• सर्व बदलांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांची अर्थपूर्ण जोपासना करावी लागेल. यासाठी अतिरिक्त संसाधनांची आवश्यकता असेल. निदान, अस्तित्त्वात असलेल्या तरतुदी कार्यक्षमतेने वापरल्या पाहिजेत. वैध रीतीने मिळणाऱ्या सुविधा त्वरित प्रदान केल्या जाणे आवश्यक आहे. यामध्ये वसतिगृह सुविधांना शैक्षणिक साहाय्य व मार्गदर्शनाची तसेच ई-सुविधेची आर्थिक तरतूद समाविष्ट आहे. हे कदाचित सोपे वाटेल परंतु हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

• एससीएचईच्या मदतीने राज्यांना विद्यापीठांना वित्तपुरवठा करण्यासाठी नवीनआराखडा देखील तयार करावा लागेल. हा आराखडा विद्यपीठाला मदत-मार्गदर्शनाची आवश्यकता आहे का, ती सर्वसामान्य आहेत की उत्कृष्ट आहेत यावर अवलंबून असेल. सर्व विद्यापीठांचा काही निरीक्षणांवर आधारित नियमांनुसार मिळणाऱ्या सामान्य वित्तसाहाय्यावर हक्क असेलच. इतर श्रेण्यांना त्यांच्या वर्गवारीत आवश्यक असलेल्या विशिष्ट कामासाठी अतिरिक्त निधी प्रदान केला जाईल (उदा. उपचारात्मक शिक्षणासाठी किंवा उत्कृष्टतेस प्रोत्साहन देण्यासाठी) जी विद्यापीठे उत्कृष्ट असतील तर त्यांना संपूर्ण स्वायत्तता दिली पाहिजे आणि त्यांना गगनभरारी मारण्याची संधी दिली पाहिजे. विशेषत: उत्कृष्ट संस्थांसाठी करता येण्याजोगी एक गोष्ट म्हणजे त्यांना अतिरिक्त सुविधांसाठी निधी उपलब्ध करुन देऊ शकणार्या व्यावसायिक/ उद्योजकांशी सामंजस्य करार करण्यास स्वातंत्र्य देणे. जर व्यावसायिक/ उद्योजकांना अशा सहभागासाठी उत्तेजन द्यायचे असेल तर विद्यापीठाच्या प्रशासन प्रक्रियेत बरीच लवचिकता यायला हवी . कदाचित या संदर्भात चीनसारख्या इतर देशांकडूनही शिकवण घेऊन की त्याकडे लक्ष देण्याची आणि अनुकरण करण्याची आवश्यकता आहे.

नियम व व्यवस्थांच्या चौकटीकडे अतिरिक्त लक्ष न देता विद्यापीठे चालविण्यासाठी विविध अभ्यास शाखांतील उत्तम नेत्यांची नेमणूक करावी. त्यांच्या विस्तृत भूमिका निश्चित केल्यामुळे ते विद्यापीठाला उत्तरदायी असतील. तर विद्यापीठे या भूमिकांना आकार देऊ शकतील प्रगल्भ राजकीय नेतृत्व समजून उमजून या प्रक्रियेपासून दूर राहील. विद्यापीठाच्या प्रकारानुसार, त्याला निधी उपलब्ध करुन द्यावा किंवा नोकरशाहीच्या दलदलीत न अडकता स्वत:च संसाधने निर्माण करण्याची/ जमावण्याची इच्छा असल्यास तशी परवानगी द्यावी. या प्रयत्नासाठी दंड न देता उलट त्यांचे कौतुक करावे. यानंतर अशा राजकीय नेतृत्वाने बाजूला होऊन एका अंतरावरून, स्वायत्ततेचा आदर ठेवून हस्तक्षेप न करता पण उत्तरदायित्वाची अपेक्षा ठेवून काळजीपूर्वक समयोजित देखरेख करावी.

**१. आता विद्यापीठे अंतर्गत पद्धतीत काय करू शकतात याकडे वळू (त्यांची स्वायत्तता ठामपणे प्रतिपादित करून):**

विभाग आणि महाविद्यालयांना खर्या अर्थाने स्वायत्तता देण्यात यावी आणि विद्यापीठाने स्पष्ट दिशानिर्देशांतून आणि दुरूनच अर्थपूर्ण पर्यवेक्षण करावे. उच्चस्तरावर नेतृत्वगुण प्रत्यक्षात सिद्ध केल्यावर किमान सर्वात खालच्या फांद्यांना लटकलेली फळे तरी तोडता येतात. एका आकारात सर्व काही बसत नाही हे ओळखून खरी स्वायत्तता (मापदंड निश्चित करून) जास्तीत जास्त विभाग/ संस्थांना वास्तविकपणे दिली गेली पाहिजे. यामुळे चांगली कामगिरी करणारी महाविद्यालये आणि विभागांना आंतरशाखीय अभ्यासास प्रवेश मिळू शकेल आणि गुणवत्ता तसेच आर्थिकस्थिती-निरपेक्ष दृष्टिकोनाची गरज यांची ओळख होईल. यासाठी उच्च पातळीवरचे नेतृत्व असणे गरजेचे आहे ही जाणले पाहिजे आणि म्हणूनच बिझनेस अॅज यूज्वल पद्धतीची नेमणूक चालणार नाही. किंवा तसे घडणे अधिक हानिकारक असेल. पर्यायी मार्ग म्हणून कुलगुरू (ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारावर) विभागीय संचालकांची नेमणूक करू शकतात आणि या निर्णयासाठी कुलगुरूंना होणाऱ्या परिणामासाठी संयुक्तपणे जबाबदार धरता येईल.

अध्यापनशास्त्राचे स्वरूप आता बदलणार आहे आणि हे बदल दीर्घकाळ चालूच राहण्याची शक्यता आहे.अशा परिस्थितीत शिक्षकांना त्यांचे कर्तव्य (अध्यापन / मूल्यांकन) पार पाडण्यासाठी माहिती तंत्रज्ञान वापरण्याची गरज आहे. त्यांच्यात ही क्षमता व सहजता निर्माण करण्यासाठी त्वरित कार्यशाळा आयोजित केल्या पाहिजेत. त्यामुळे शिक्षक हे प्लॅटफॉर्म्स सहज वापरू शकतील. हे बदल आणण्यासाठीचा केंद्रबिंदू म्हणून एचआरडीसी केंद्रे वापरणे सुज्ञपणाचे आहे. यासाठी अनेक कार्यशाळा आणि प्रशिक्षण मॉड्यूल तयार करावे लागतील. संभाव्य परिणामाबद्दल शिक्षक आणि इतर भागधारकांबरोबर विचारमंथन करून त्यांच्या सहभागातून हे साध्य केले पाहिजे.

विद्यापीठाच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये असलेल्या अर्ध-शहरी आणि ग्रामीण भागात डिजीटलायझेशन पोचवण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाह्य निधीची आवश्यकता भासेल. यासाठी सरकारने थेट मदत करावी. कदाचित शहरी भागात विद्यापीठ स्वतःच निधी उभारू शकेल. असे केल्यास, विद्यापीठांकडून माहितीसाठी कार्यक्रमांचे नियोजन तसेच वित्तपुरवठा प्रोटोकॉल मागितले जाऊ शकतात. परंतु हे करण्यासाठी त्यांनी स्वबळावर स्वायत्त पद्धतीने काम केले पाहिजे. राज्य शासन केवळ समन्वय प्रयत्नांना मदत करेल.

विशेषत्वाने उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी, स्थानिक ज्ञान केंद्राची (मराठी) स्थापना करणे आवश्यक आहे. या केंद्रावर प्रथम विविध विषयांतील दर्जेदार अभ्यास- साहित्य मराठीत उपलब्ध करुन देण्याची आणि आणि नंतर शेवटी मराठीत ज्ञान निर्मितीची जबाबदारी असेल. यामुळेच सेलच्या ऐवजी आम्हाला केंद्राची गरज आहे. हे एक अनेक विषय हाताळू शकणारे केंद्र असणे आवश्यक आहे. येथे मार्गदर्शक म्हणून कुशल व्यक्ती असतील. (चांगल्या निवृत्त शिक्षणतज्ञांचा उपयोग करून घेता येईल). ज्यांच्याकडे दुसरे काहीच काम नाही अशा लोकांना सामावून घेण्याची जागा म्हणून या केंद्राची दुर्दशा होणार नाही याची काळजी घेतली जाणे आवश्यक आहे. 'यासाठी वरिष्ठ नेत्यांकडून प्रेरणा आणि चालना देण्याची आवश्यकता भासेल. अन्यथा हे केंद्र टोकनिझममध्ये वाया जाईल या आयटी-सक्षम फ्रेमवर्कमधे शिक्षकांच्या भूमिकेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. भविष्यात कामकाज मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन (सर्व भागधारकांद्वारे) केले जाईल अध्यापनाच्या दृष्टीने, विद्यार्थ्यांच्या तीन श्रेणी असतात

म्हणजेच, सरासरीपेक्षा कमी, सरासरी आणि उच्च कामगिरी करणारे. या तीनही श्रेणीतील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या पद्धतीने शिकवण्याची आवश्यकता असते. शिक्षकांत ही क्षमता तयार करायला हवी. सुधारात्मक,गतियोजित आणि चर्चात्मक शिक्षण पद्धती समजून घेणे आणि संस्थेत रुजवणे जरूरी आहे. सध्याच्या जगात ओपन-सोर्स मॉडेल्समध्ये प्रथम-दर-अध्यापनाची संसाधने उपलब्ध असल्याने, वर दिल्याप्रमाणे शिक्षकांच्या भूमिका पुन्हा नव्याने शोधावी व बदलावी लागेल.

हे सर्व अशा अशा अंदाजावर आधारित आहे की आपण सध्याच्या संकटाच्या सीमा ओलांडून गेल्यानंतरही एक नवीन सामान्यता (न्यू नॉर्मल) आपल्यासमोर असेल. ही पुनर्रचना करून माहिती तंत्रज्ञानाचा लाभ मिळवण्यासाठी क्षमता निर्माण करण्याची संधी आहे. यात फक्त भौतिक पायाभूत सुविधांचीच नव्हे तर वरच्या स्तरापासून सर्व भागधारकांची मनोवस्था बदलण्याची गरज आहे. हे फार महत्वाचे आहे, कारण जिथे उत्कृष्टतेचा प्रश्न असेल किमान तिथे तरी नवीन नियम आणि कार्यपद्धतीं ची रचना करण्यासाठी सुरुवातीचा बिंदू म्हणून विश्वासाला संशयाची जागा घ्यावी लागेल. पुनः एकदा, एचआरडीसी सेंटरला केंद्रबिंदू म्हणून वापरल्यास आणि सहभागीदृष्टिकोन ठेवल्यास उपयुक्त ठरेल.

विद्यापीठांची एकंदर रचना लवचिक / स्मार्ट असणे आवश्यक आहे आणि म्हणूनच, मोठ्या आणि नियोजन करण्यास अवघड अशा संबद्ध संरचना नष्ट कराव्या लागतील (आधी सांगितल्याप्रमाणे क्लस्टर्स बनवून / स्वायत्तता देऊन/ छोट्या विद्यापीठांमध्ये विभागून). यामुळे उपलब्ध निधी (उदाहरणार्थ रुसाकडून मिळणारा) मिळवण्याबाबतची त्यांची सध्याची दयनीय स्थिती सुधारेल. सध्याच्या युगात अत्यंत आवश्यक असलेले आंतरशाखीय स्वरूप विद्यापीठाच्या प्रणालीमध्ये समाकलित करता येईल.आंतरशाखीय अभ्यासक्रम आणि संशोधनाचा विचार करता, कॅफेटेरियाच्या पध्दतीने लवचिकतेणे शिक्षण देणे आता निवड-आधारित अभ्यासक्रमांमध्ये उत्तम रीत्या रुजले आहे.

संशोधन ही वेगळी बाब आहे. यासाठी भिन्न भाषा बोलणार्या लोकांसह एकत्र काम करण्याचे, वेगळे कौशल्य शिकणे आवश्यक आहे. हे करण्याचा एक मार्ग म्हणजे (विशेषत: जेथे परंपरागत अशी पद्धत अस्तित्त्वात नाही तिथे), सार्वजनिक आरोग्य संशोधन केंद्र स्थापित करणे. याामुळे वेगवेगळ्या विदयशाखा एकत्र येतील कारण त्यात वेगवेगळया दृष्टिकोनातून उपयुक्त डेटा संकलित करतात. तसेच संशोधनविषय असलेल्या समस्यांवर वास्तविक जगातल्या समस्यांप्रमाणे समग्रतेने संशोधन केले जाते. यामुळे दुहेरी हेतू साध्य होतात: एक म्हणजे उपयुक्त आंतरशाखीय संशोधनास प्रोत्साहन मिळते आणि समाजासमोर उभ्या असलेल्या खऱ्या समस्या सोडविण्यासाठी मदत करता आल्यामुळे समाजात आपला ठसा उमटवता येतो. अखेर विद्यापीठे या सामाजिक संस्था आहेत आणि समाजाच्या समस्यांपासून त्या अलिप्त राहू शकत नाहीत.

आम्ही उच्च शिक्षणासाठी सूचना / शिफारसी सादर करत असतानाच नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी) आणले गेले आहे. एनईपी हा एक परिवर्तनीय दस्तऐवज आहे. ती जरी मूळ अहवालाची संक्षिप्त आवृत्ती असली तरी तिचे स्वरूप व्हिजन डॉक्युमेंटचेच आहे. हे व्हिजन डॉक्युमेंट शिक्षण क्षेत्राचे तुलनात्मक स्थिर चित्र सादर करते. यात अंमलबजावणीविषयी फक्त काही सूचना आहेत. राज्य सरकारनेही आता एक वास्तववादी आणि प्राधान्यक्रम

असलेला कृती आराखडा तयार करण्यासाठी गांभीर्याने काम करण्याची  गरज आहे. संसाधनांचे आवरण  व राज्याची उपलब्ध क्षमता वास्तविकअंदाज लक्षात घेऊन ही योजना तयार करणे आवश्यक आहे. जेणे करून यातून प्राप्त होणाऱ्या शिफारशी कृतीत उतरू शकतील.

**हा धोरणात्मक मसुदा  महाराष्ट्र सरकारला सादर केलेल्या क्षेत्रनिहाय धोरणांच्या शिफारशींचे संकलन आहे.**

कोविड-१९ महामारीनंतर राज्याला पुनर्चालना देण्यासाठी आणि या संकटाच्या परिणामांतून बाहेर पडण्यासाठी योजना, कार्यक्रम आणि धोरणात्मक उपाय विकसित करण्याकरता, हा अभ्यास व त्यातून पुढे आलेल्या शिफारशी महाराष्ट्र शासनाला उपयुक्त ठरतील अशी आम्हाला आशा आहे.

पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या सदस्यांमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील (विज्ञान, कला, वाणिज्य, संस्कृती आणि खेळ अशा विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्तीचा समावेश आहे.)

**रघुनाथ माशेलकर** **विजय केळकर** सी.एनआर.राव राहुल द्रविड बाबासाहेब पुरंदरे **अनु आगा** **माधव गाडगीळ** **चंदू बोर्डे** **अभय फिरोदिया** अशोक गांगुली **सायरस पूनावाला** फरीद झकारिया गौतम बंबवाले **जावेद अख्तर** **प्रभाकर करंदिकर** लता मंगेशकर **नंदन निलेकणी** जयंत नारळीकर अनिल सुपनेकर राहुल बजाज **सचिन तेंडुलकर** सई परांजपे **दीपक पारेख** शबाना आझमी अभय बंग **सुनील गावस्कर** विजया मेहता भूषण गोखले अतुल किर्लोस्कर प्रमोद चौधरी **जब्बार पटेल** विजय भटकर क्रिस्टोफर बेनिन्जर एम.एम.शर्मा के.एच.संचेती सुमन किर्लोस्कर रवी पंडित बाबा कल्याणी **नौशाद फोर्बस** **किरण कर्णिक** एस. रामादोराई अमिताव मलिक **प्रताप पवार** नरेंद्र जाधव **शांताराम मुजुमदार** अविनाश दिक्षित **अरुण फिरोदिया** अजित निंबाळकर सतीश मगर मुकेश मल्होत्रा **सुरेश पिंगळे** विनायक पाटणकर **शमशेर सिंह मेहता** गणेश नटराजन

पुणे इंटरनॅशनल सेंटर

**प्रशांत गिरबने**
संचालक

आय सी सी ट्रेड टॉवर, ए विंग, पाचवा मजला, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११०१६.
info@puneinternationalcentre.org | www.puneinternationalcentre.org
@PuneIntCentre